Edited by Foxit PDF Editor
Copyright (c) by Foxit Software Company, 2004
For Evaluation Only.

# प्रारूपण

## राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण आणि निवारा धोरण २००६

भारत सरकारसाठी
एक प्रस्ताव

प्रेरक

दक्षिण आशिया
क्षेत्रीय ज्ञान मंच
(साउथ एशिया
रीजनल नॉलेज प्लॅटफॉर्म)

अनुक्रम:

या दस्तावेजासंबंधी
१. प्रस्तावना
२. उद्दिष्टे
३. मार्गदर्शक तत्त्वे
४. विशिष्ट कृती क्षेत्र
५. हिस्साधारकाची भूमिका
६. कृतियोजना / पाठपुरावा

परिशिष्ट – नवी दिल्ली येथे दि. २३ फेब्रुवारी २००६ रोजी भरवण्यात आलेल्या कार्यशाळेत विकसित करण्यात आलेल्या ‘राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण आणि निवारा धोरण’ याच्या पहिल्या मसुद्यामधील अंशदाता

पुअरेस्ट एरियाज सिव्हिल सोसायटी (पॅक्स) कार्यक्रम – डीएफआयडी

**या दस्तावेजासंबंधी**

ज्या घरात पिण्यासाठी पाणी, सांडपाण्याचा निचरा आणि घरेलू ऊर्जा या मूलभूत सोयी आहेत आणि जिथे खाजगी, सुरक्षित जीवन सन्मानाने जगता येते, असे घर मिळणे हा समाजातील प्रत्येकाचा हक्क आहे. शिक्षण, आरोग्य व त्याबरोबर उत्पन्न निर्मितीच्या विशेष संधी हे मानवी लोकवस्तीचे घटक निर्मितीक्षम समाजाच्या स्वास्थ्यासाठी अत्यावश्यक आहेत.

सर्व नागरिकांना मूलभूत मानवाधिकार आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. एक राष्ट्र या नात्याने आपण स्वत:साठी अशी 'धोरणे' तयार करत असतो, ज्यांच्यामधून अधिकारांची पूर्तता होईल आणि सर्वांना समान संधी उपलब्ध होतील.

राष्ट्रीय निवारा धोरणाची वाटचाल गेल्या काही दशकांमध्ये ''सर्वांना पुरेसा निवारा'' हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने होत आहे. राष्ट्राच्या प्राधान्यक्रमाशी आणि सामाजिक व आर्थिक स्थितीतील स्थूल बदलांशी जुळवून घेण्यासाठी त्यात अनेक फेरबदल होत गेले आहेत. १९९८ मधील शेवटच्या राष्ट्रीय निवारा धोरणाची व्याप्ती जरी मोठी होती, तरी ग्रामीण भागाला निकडीच्या व गरजेच्या वाटणाऱ्या बाबी यांच्यावर त्यात भर नसल्याने ते धोरण ग्रामीण भागासाठी दिशादर्शक ठरण्यात कमी पडले. नवे 'राष्ट्रीय शहरी गृहनिर्माण व निवारा धोरण' शहरातील निवाऱ्याचे प्रश्न सोडवू पहात आहे. ग्रामीण भागातील निवाराविषयक निकड पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भारताचे अंतरंग ओळखणारे, तेथील गरजा व क्षमता लक्षात घेणारे 'ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरण' तयार होण्याची आवश्यकता आहे.

ग्रामीण निवारा विकास आणि एकंदर अर्थव्यवस्था, यांचे नाते मागास – प्रगत या स्वरूपाचे असल्याने या विकासाकडे पहाताना ग्रामीण भागातील गरिबीचा संदर्भ अपरिहार्यपणे घ्यावा लागतो. भारत निर्माण कार्यक्रम व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (एनआरइजीए) म्हणजे याच दिशेने टाकलेली पावले होत. यातून सकारात्मक आंदोलने आकारास यावीत आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत ''जनतेची'' गुंतवणूक व्हावी, यासाठी आपण निवारा व उपजीविका यांची शाश्वत साधने ग्रामीण भागात निर्माण करेल, असे एक राष्ट्रीय ग्रामीण निवारा धोरण स्वत:साठी तयार करणे आत्यंतिक गरजेचे आहे. बेसिन–साउथ एशिया रीजनल नॉलेज प्लॅटफॉर्म (बेसिन–एसए) यांनी पुढाकार घेऊन 'राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरणा'च्या विकासासाठी विविध हिस्साधारकांच्या कल्पना, त्यांची मते व यशस्वी ठरलेल्या पद्धती यांना एकत्र आणले आहे. या संवादामागे द बिल्डिंग अँड सोशल हाउसिंग फाउंडेशन, यूके आणि स्विस एजन्सी फॉर डेव्हलपमेंट अँड कोऑपरेशन यांच्या आधारावरील संशोधन व दस्तावेज यांची प्रेरणा आहे. या प्रक्रियेत देशभरातील व्यावसायिक व धोरणकर्ते यांच्यासमवेत सखोल संशोधन व सल्लामसलत करून ग्रामीण स्थिती, तेथील सामर्थ्यस्थळे, गरजा आणि निवारा व उपजीविका यांच्या संदर्भात विशाल पातळीवरील विकासाच्या क्षमता समजावून घेण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेमधून 'भारताच्या ग्रामीण निवारा धोरणासाठी चौकट' विकसित झाली आहे. यातूनच प्रेरणा घेऊन बेसिन–एसएने देशभरातील विविध हिस्साधारकांच्या सहयोगाने सुयोग्य अशा ग्रामीण निवारा धोरणाचा मसुदा तयार करण्याची व तो भारत सरकारला पाठवण्याची प्रक्रिया गतिमान केली. पहिली पायरी म्हणून बेसिन–एसए यांच्या प्रेरणेने २३ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथे अखिल भारतीय समाज सेवा संस्थान यांच्या वतीने एक सल्लाबैठक पार पडली, जिला डीएफआयडीच्या पुअरेस्ट एरियाज सोसायटी कार्यक्रमाने प्रायोजित केले होते. या बैठकीस जमलेल्या स्वयंसेवी संस्था, बँकर्स व शासकीय कार्याधिकारी यांनी चर्चा व वादविवाद यांच्या द्वारे धोरणाच्या मसुद्यातील कलमे सुचवली (सहभागी झालेल्यांची सूची परिशिष्ट १ मध्ये पहा). या प्रक्रियेद्वारे तयार झालेला पहिला धोरणमसुदा आपणापुढे सादर केला जात आहे. धोरणातील कलमे व तरतुदी यांवर विशाल स्तरावर चर्चेला यातून आरंभ व्हावा, अशी अपेक्षा आहे. हा मजकूर 'राष्ट्रीय शहरी गृहनिर्माण व निवारा धोरणाचा मसुदा' (२००५) यावर मोठ्या प्रमाणात बेतलेला असून यात शहरी व ग्रामीण भागातील धोरणांना जोडण्याचा प्रयत्न केला आहे.

धोरणविकासाची प्रक्रिया आता दोभरातील सर्व राज्यांमध्ये सल्लामसलतीसाठी नेण्यात येत आहे. प्रत्येक राज्यस्तरीय सल्लामसलतीतून येणाऱ्या सूचना प्रक्रियेच्या प्रवासातील प्रत्येक पातळीवर सामावून घेण्यात येईल आणि अखेरीस 'भारतीय ग्रामीण निवारा धोरणाचा अंतिम मसुदा' साकारून तो भारतीय जनतेतर्फे सरकारला सादर करण्यात येईल.

(????? वाचकांच्या सूचना, टीका यांचे स्वागत आहे. बदल अवश्य सुचवावेत.?????)

## १. प्रस्तावना

१.१ ग्रामीण भारतातील परंपरेत निवारा तयार करणे हे ‘लोकांचे काम’ राहिले आहे. त्याकडे उत्पादन म्हणून न बघता उपभोग म्हणून पाहिले, तर या कामासाठी गाठीशी पुरेसा पैसा साठल्यावरच स्त्रिया वा पुरुष कुटुंबाच्या गरजेनुसार घराची दुरुस्ती वा विस्तार वा बांधकाम हाती घेतात. ग्रामीण भागातील अनेक लोक, बहुतेक वेळा आर्थिक कारणांमुळे घराकडे पिण्याचे पाणी वा सांडपाण्याचा निचरा यांच्यापेक्षा वेगळी बाब म्हणून बघतात. घर हे सामाजिक प्रतिष्ठेचे चिन्ह असते, तर या इतर गोष्टी गरजा असल्या तरी ‘डोक्यावर छप्पर’ असण्यापुढे दुय्यम मानल्या जातात. ग्रामीण विकासाच्या प्रथेमध्ये ‘निवारा’ या गोष्टीकडे बघताना त्यात सुरक्षित व आटोपशीर वास्तू, पिण्यासाठी पाणी व सांडपाण्याचा निचरा, उपजीविका आणि सामाजिक साधनसुविधा यांचा समावेश व्हायला हवा.

१.२ निवारा ही मानवाची मूलभूत गरज आहे. तिचे स्थान अन्न आणि वस्त्र यांच्या पाठोपाठ आहे. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याकरता निश्चिंतपणे काम करण्याजोगी एक सुरक्षित, आरोग्यपूर्ण जागा मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय गृहनिर्माण व निवारा धोरणाची गरज या जबाबदारीतूनच निर्माण होते. ग्रामीण भागातील जीवनमान सुधारावे व तिथे विकासाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, ही तळमळ देखील आहे. यूनोने १९९९ साली केलेल्या अंदाजानुसार २०००–२००५ या काळात ०.८२% असलेला ग्रामीण लोकसंख्या वाढीचा दर २०२५–३० पर्यंत (–) ०.४०% झालेला असेल. म्हणजेच देशातील ग्रामीण भागातून शहरांकडे वेगाने स्थलांतर होणार आहे. गावा–खेड्यांमध्ये रोजगाराच्या संधींची स्थिती फारच खराब असल्याने आज ८०% पेक्षा जास्त ग्रामीण कुटुंबांना आवश्यक उपजीविकेची शाश्वती नाही. बिहार, राजस्थान,उत्तर प्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांतल्या अत्यंत दरिद्री भागांमधील निवारासंबंधी दुर्लक्षित स्थितीमधून ग्रामीण भागातील जनतेची असहाय्यता अधिकच स्पष्ट होते. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था आणि वातावरण जर विकास पावले; तर शहरभागाचे आकर्षण कमी होईल, हे उघड आहे.

१.३ घर ही माणसाची अत्यंत मूलभूत गरज तर आहेच, शिवाय त्यात विकासाचा वेग वाढवण्याची क्षमता सुद्धा आहे. इतर कोणत्याही उद्योगधंद्याप्रमाणे गृहनिर्मितीतील गुंतवणुकीमुळे उत्पन्न व रोजगार यांमध्ये झपाट्याने वाढ होते. एका अंदाजानुसार गृहनिर्माण / बांधकाम या क्षेत्रात होणाऱ्या वाढीव गुंतवणुकीमधून जो थेट रोजगार निर्माण होतो, त्याच्या आठ पट रोजगार एकूण अर्थव्यवस्थेत निर्माण होत असतो (आयआयएम–अहमदाबाद अभ्यास, २०००). १६% कष्टकऱ्यांना (१९९७ मधील प्रत्यक्ष संख्या १४६ लक्ष) बांधकाम क्षेत्रामधून रोजगार मिळत असतो. यात ७% दराने वाढ होत आहे. यांपैकी ८५.५ लक्ष कष्टकरी एकट्या गृहनिर्माण क्षेत्रात आहेत आणि त्यात गरिबांचा वाटा महत्त्वाचा आहे. घरबांधणीमुळे घरच्या घरी आर्थिक उपक्रम अंगिकारण्याची संधी उपलब्ध होते आणि त्याच वेळी रहिवाशांच्या आरोग्याचा स्तरही ठरतो. म्हणूनच, आरोग्य व उत्पन्न या निकषांवर गृहनिर्माण हे एक गरिबी दूर करण्याचे व रोजगार निर्मितीचे अतिशय प्रभावी हत्यार आहे.

१.४ विकासाचे स्वरूप, वसतीचा स्तर व निवाऱ्याची एकंदर गणवत्ता यांवर घरबांधणीच्या आवश्यकतेचे प्रमाण ठरते. २००१ सालच्या भारतीय जनगणनेनुसार घरांच्या तुटवड्यात ग्रामीण भागाचा वाटा ६५% आहे. भारतातील ७१% लोकसंख्या गावात राहते आणि त्यातील फक्त ४१% लोक पक्क्या (वा कायमस्वरूपी) घरांमध्ये राहतात. सुमारे ७८% ग्रामीण कुटुंबांना पाण्याचा ‘कसल्याशा प्रकारचा’ स्रोत उपलब्ध असतो, तर शारीरिक स्वच्छतेची सोय असलेल्यांची संख्या २३% पेक्षा कमी आहे. अशा परिस्थितीत, ग्रामीण कुटुंबांच्या घरासंबंधी विशिष्ट गरजा ध्यानात घेऊन आणि शेतीमधील, शेतीसंबंधित व शेतीबाहेरील उपजीविकेचा विचार करून त्यांच्या घरांची गरजेची पुरेशा प्रमाणातील पूर्तता करणाऱ्या, तसेच शारीरिक स्वच्छतेची सोय व पाणी पुरवठा यांची दखल घेणाऱ्या सर्वसमावेशक दृष्टिकोनाची नितांत आवश्यकता आहे.

१.५ १९९१चे आर्थिक उदारीकरणाचे धोरण, १९९४ चे राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण, १९९८चे राष्ट्रीय गृहनिर्माण व निवारा धोरण आणि १९९२ मधील ७३वी घटनादुरुस्ती यांकडून चालना घेऊन सार्वजनिक क्षेत्राने गेल्या १५ वर्षांत मनुष्यवस्तींमध्ये केलेल्या हस्तक्षेपात्मक कृती व त्याच्याशी निगडित अशा इतर घडामोडी यांच्या पुढचे पाऊल, असे या धोरणाचे स्वरूप आहे. सार्वजनिक क्षेत्राची पुनर्व्याख्या एक ‘प्रोत्साहक’ अशी करणे, खाजगी क्षेत्राला अधिक क्रियाशील बनवणे, विकेंद्रीकरण, शासननिधीतर्फे मिळणाऱ्या सवलती व उत्तेजन यांचा विकास, गृहनिर्मितीसाठी होणाऱ्या वित्तपुरवठ्याला गती देणे आणि पर्यावरणास अनुकूल अशा किफायतशीर व गरिबांच्या सोयीच्या तंत्रज्ञानाला उत्तेजन देणे यांच्या दिशेने वरील धोरणांचा रोख राहिला होता.

१.६ इंदिरा आवास योजना आणि स्वर्णजयंती ग्रामीण स्वरोजगार योजना (एसजीएसवाय) यांसारखे कार्यक्रम व योजना यांच्या माध्यमातून केलेल्या धोरणाच्या अंमलबजावणीचा परिणाम गृहनिर्माण व मनुष्यवस्ती या क्षेत्रांमध्ये मिश्र स्वरूपाचा झालेला दिसून येतो. या धोरणाची वाटचाल शासनाचे मागील उपक्रम व ग्रामीण भागात शहरी सोयीसुविधा पुरवणे (पीयूआरए), भारत निर्माण कार्यक्रम व राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम (एनआरइजीए) यांसारखे हल्लीचे उपक्रम यांमधून मार्गदर्शन घेऊन झाली आहे.

१.७ घरबांधणी व साधनसुविधा यांची मागणी व त्यांचा पुरवठा यातील दरी मरून काढून किफायतशीर किंमतीत पुरवठा वाढवणे व त्यायोगे स्थानिक अर्थकारणाला लाभ मिळवून देणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. या संदर्भात सार्वजनिक क्षेत्राला एक प्रोत्साहक बनवण्यावर भर देण्यासाठी विशेष कृती सुचवण्यात आल्या आहेत. त्याच वेळी ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासाचा सर्वसाधारण संदर्भ ध्यानात ठेवून घरे व साधनसुविधा यांच्या निर्मितीत संसाधनांचे केंद्रीकरण घडवून आणणे व विविध हिस्साधारकांचा सहभाग मिळवणे अत्यावश्यक आहे.

१.८ गृहनिर्माण व निवारा या क्षेत्रांमध्ये भारतात व इतरत्र जे अभिनव प्रयत्न झाले, त्यांच्याकडूनही या धोरणाने प्रेरणा घेतली आहे. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी यात उद्दिष्टे व अनुल्लंघनीय अशी अपरिवर्तनीय तत्त्वे विशद करण्यात आली आहेत. तसेच, यात कृतियोग्य मुद्यांची एक सूची देखील आहे, जिच्यात इतर गोष्टींबरोबर सामाजिक सहभाग व स्वयंसहाय्य यांना प्रोत्साहन, उपजीविका व निवारा यांची सांगड, पंचायत राज्याच्या चौकटीतील अमलाचे विकेंद्रीकरण, पर्यावरणदृष्ट्या शाश्वत अशा तंत्रज्ञानाचा विकास आणि स्थानिक उत्पादन, बांधकाम सामग्रीचा पुरवठा व तंत्रज्ञान यांचे प्रमाणीकरण यांचा समावेश आहे. त्यात निधीपुरवठ्याला वेग येण्यासाठी बचत करण्याला, तसेच गोरगरिबांस अनुकूल अशा सहयोगांस, नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणास आणि परिसरास अनुकूल असणाऱ्या, गोरगरिबांभिमुख अशा व संकटांना प्रतिकार करण्याची क्षमता बाळगणाऱ्या इमारत बांधकाम पद्धतींना उत्तेजन आहे. विविध हिस्साधारकांना सुनियोजित, एकात्मिक, पारदर्शक, परस्परांस स्वीकारार्ह आणि गरिबांभिमुख अशी कृति सर्वोत्तम रीतीने करण्यास मार्गदर्शन मिळावे, हा यामागचा उद्देश आहे.

१.९ या धोरणामध्ये विविध हिस्साधारकांच्या भूमिकेची आणि जमीन, वित्तपुरवठा, वैधानिक व नियामक सुधारणा, तंत्रज्ञान सहाय्य आणि निवाराविकासातील अंतरण, पायाभूत साधनसुविधा, शाश्वततेची काळजी, बांधकाम क्षेत्रातील रोजगाराचे प्रश्न आणि धोरणाच्या अंमलबजावणीवर नजर ठेवण्याची चर्चा आहे.

१.१० अंतिमत:, गृहनिर्मितीशी निगडित पायाभूत सोयीसुविधा व उपजीविकेसाठी होणारे प्रयत्न यांच्यात चेतनादायी समन्वय साधणे, हाच या धोरणाचा मानस आहे. दारिद्र्यनिवारण होणे, उत्पन्न व रोजगार यांची निर्मिती होणे आणि सर्व जनांना निवारा लाभून मानवनिवासाचा शाश्वत विकास होणे यांना पूरक ठरणे. हा या धोरणाचा हेतू आहे.

## २. उद्दिष्टे

२०१० पर्यंत राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण धोरणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

(१) मालकी तत्त्वावरील व भाड्यावरील, अशा दोन्ही प्रकारच्या घरांची पुरेशा प्रमाणात उभारणी करणे.

(२) आदिवासी, मागास वर्ग, अपंग, वृद्ध व स्त्री प्रमुख असलेली कुटुंबे यांच्याकडे विशेष लक्ष देऊन सेवाप्राप्त जमीन वेगाने उपलब्ध करणे आणि तसे करताना सर्व गटांसाठी पायाभूत सेवा व साधनसुविधा विकासित करण्याच्या गरजेची योग्य दखल घेणे.

(३) सर्व निवासस्थानांना वैयक्तिक स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा सहजपणे उपलब्ध होईल आणि पर्यावरणास अनुकूल अशा शेतीमधील, शेतीसंबंधित व शेतीबाहेरील उपजीविकेच्या पायाभूत साधनसुविधा मिळतील याची दक्षता घेणे.

(४) गावाचा विकास अशा तऱ्हेने करणे, ज्यायोगे परिसर आरोग्यदायी होईल, पुनर्वापर शक्य असलेल्या ऊर्जास्त्रोतांचा वाढीव वापर होईल, वातावरण प्रदूषणमुक्त राहील आणि कमावते जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचा

निचरा या व इतर पर्यावरणीय बाबींकडे योग्य ते लक्ष पुरवले जाईल.

(५) वित्तपुरवठ्यात आणि निम्नस्तरीय वित्तसहाय्य सुविधा, स्वयंसहाय्यता गट (एसएचजी) कार्यक्रम व गावपंचायतीस पायाभूत साधनसुविधांसाठी कर्जसहाय्य यांच्यासह कृतिशील वित्तपुरवठ्याचे इतर मार्ग यांच्यात वाढ होण्यास अनुकूलता निर्माण करणे; ज्यायोगे गृहनिर्मितीच्या महसुली गरजा व मागणीआधारित पायाभूत साधनसुविधा यांची पूर्तता शक्य होईल.

(६) नागरिकांना; विशेषत: अनुसूचित जाती/जमाती, अपंग, मुक्त झालेले वेठबिगार, वयस्क, स्त्रिया व समाजातील इतर कमकुवत गट यांना दर्जेदार व किफायतशीर घरांचे पर्याय उपलब्ध करून देणे.

(७) ग्रामीण वसतीस्थानांना मार्दर्शन करणे, ज्यायोगे पीयूआरएसारख्या अभिनव पद्धतींच्या मदतीने सुनियोजित व संतुलित वाढ घडून येईल आणि सद्यस्थितीत सुधारणा दिसून येईल.

(८) गृहनिर्माण क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आणि रटाळपणा कमी करून कार्यक्षमता, उत्पादकता, दर्जा व शाश्वतता यांच्यात वाढ घडवून आणणे. गरिबांची घराची गरज भागवण्यासाठी आणि 'हरित' गृहनिर्मितीच्या विशिष्ट आवश्यकतांच्या पूर्ततेसाठी तंत्रज्ञानाला आवर्जून जुंपले जाईल.

(९) भाडेपट्टी, जमीन, वित्त व तंत्रज्ञान सहजी उपलब्ध होण्याआड येणाऱ्या कायद्याच्या, वित्तपुरवठ्यातील व प्रशासकीय अडचणी दूर करणे.

(१०) राज्यस्तरीय व स्थानिक शासनस्तरीय संस्थांना आधार देऊन, त्यांची पुनर्रचना करून व त्यांना सक्षम बनवून जमीन संपादन करणे आणि गृहनिर्मितीसाठी व मूलभूत सोयींसाठी व सामाजिक साधनसुविधा उपलब्ध करण्यासाठी वित्तसहाय्य मिळवून देणे.

(११) खाजगी, सार्वजनिक व सहकारी क्षेत्रांमध्ये मजबूत बंध निर्माण करुन ग्रामीण निवाऱ्याच्या प्रत्येक भागात सहभागी होण्यासाठी बांधकाम उद्योगाच्या क्षमतेत वाढ घडवून आणणे.

(१२) गृहनिर्माण/निवारा योजनांची उभारणी, त्यांची रचना व अंमलबजावणी यात जनतेचा, विशेषत: अपंग, समाजातील दुर्बल घटक, स्त्रिया व कमकुवत गट यांचा सहभाग प्राप्त करणे.

(१३) पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि आपला सांस्कृतिक वारसा, स्थापत्यशास्त्र आणि पारंपारिक कौशल्ये व ज्ञान यांचे संवर्धन करणे.

(१४) ग्रामीण गृहनिर्माण व निवारा या क्षेत्रात व्यवस्थापन माहितीची प्रणाली स्थापना करणे.

(१५) गृहनिर्माण क्षेत्राद्वारे जादा रोजगार निर्माण करणे आणि गृहनिर्मिती व बांधकाम या कार्यक्षेत्रांतील कौशल्यांचा विकास करून त्यायोगे एनआरइजीएमधील तरतुदींना चेतना देणे.

## ३. मार्गदर्शक तत्त्वे

तत्त्व या शब्दाचा अर्थ ऑक्सफर्ड ॲड्व्हान्स्ड लर्नर्स डिक्शनरीमध्ये 'प्रक्रिया व कृती यांना मार्ग दाखवून एका दृष्टिकोनाची निश्चिती करण्यास सहाय्य करणारे मूलभूत सत्य' असा देण्यात आला आहे. निवारा विकासाच्या संदर्भात तत्त्व म्हणजे मानवी रहिवासाच्या सामाजिक, पर्यावरणीय व आर्थिक शाश्वततेसाठी जबाबदार असलेले 'सर्वमान्य प्रमाण'. राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरणामागील मार्गदर्शक तत्त्वे अशी आहेत:

**समावेशकता व लवचिकता यांचे तत्त्व**

हे तत्त्व मानते की निवाऱ्यासंबंधित कृतींची गुणवत्ता व शाश्वतता यांच्या प्राप्तीसाठी निवारा विकासामध्ये विविध हिस्साधारकांचा, विशेषत: सहभागी समाजघटकांचा, त्यातही विशेष म्हणजे स्त्रियांचा समावेश होणे निर्वाणीच्या महत्त्वाचे आहे. ग्रामीण भारतातील

निवाराविकासाचे स्वरूप आजवर स्वयंसहाय्यावर आधारित अशी एक 'मालकचलित प्रक्रिया' असे राहिले आहे. वित्त व तंत्रज्ञान यांचे कळीच्या महत्त्वाचे पाठबळ असल्यावर लोकांच्या सहभागातून होणारी अंतिम निर्मिती ही बहुतेक निवारा 'प्रकल्पां'पेक्षा किती तरी जास्त सरस असते. सर्वाधिक दरिद्री लोकसमूहांच्या दृष्टीकोनातून पहाता भारतातील स्थानिक प्रशासनाचा पाया असलेल्या पंचायत राज्यासारख्या संस्थाच (पीरआरआय) स्थानिक संसाधने व गावसमाजाच्या मालकीची संपत्ती यांच्या व्यवस्थापनासाठी व त्याबरोबर समाजकल्याणाच्या कृतीसाठी तळागाळाच्या पातळीवर जबाबदार असल्याने, अशा संस्थांचा सहभाग कळीच्या महत्त्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे निवाराविकासाचे स्वरूप बाजारपेठेने प्रेरित झालेल्या, संतुलित अशा व लघुव्यावसायिकांकडे लक्ष केंद्रित करणाऱ्या विकासप्रक्रियेचे राहील.

धोरणसंबंधित कृतींमधून, विशेषत: नियोजन व अंमलबजावणी यांच्या पातळीवर लवचिकतेला उत्तेजन देणे जरूरीचे आहे. यामधून निवारा धोरणाचा आशय स्थानिक संदर्भात केला जाऊन तळागाळाशी ते अधिक प्रभावी होईल. यात कृतियोजनांच्या स्वरूपातील लवचिकता, समाजाधारित प्रक्रियांमधून त्यांची अंमलबजावणी, तंत्रज्ञानाची निवह आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वित्तीय संसाधनांचे स्थानिक गरजांनुसार वाटप, यांचा समावेश आहे.

### समन्वयाचे तत्त्व

समन्वयाच्या तत्त्वामधून निवास, मूलभूत सोयी, उपजीविका व सामाजिक साधनसुविधा आणि नैसर्गिक संसाधने हे सर्व निवारा विकास म्हणून एकत्रितपणे उपलब्ध होते. इतरांच्या उपस्थितीविना यापैकी कोणतेही एक जीवनाचा स्तर उंचावू शकत नाही; आणि ,कत्रितपणे त्यांचा प्रभाव किती तरी जास्त असतो. पक्के (वा कायमस्वरूपी) घर हेच ग्रामीणभागातील अनेकांसाठी कामाचे ठिकाण असते आणि तिथेच त्यांचे उत्पन्न निर्माण होते. स्वच्छ परिसरातील सुरक्षित घरामुळे लोकांचे आरोग्य सुधारते व शिक्षणाकडे ओढा निर्माण होतो. उपजीविकेच्या समाज पातळीवरील साधनसुविधा आणि सोयी यांमुळे ग्रामीण उद्योगाला उत्तेजन मिळते व सर्वसाधारणपणे जीवनाच्या स्तरात सुधारणा होते. ग्रामीण भागांच्या विकासामुळे शहरांच्या दिशेने होणारे स्थलांतर घटून शहरी जमीन, साधनसुविधा व सेवा यांवरचा ताण कमी होतो. म्हणजेच, विशाल दृष्टिकोनातून पहाता सुरक्षित, निश्चिंत निवारा आणि जीवनस्तराचे इतर पैलू यांच्यात थेट संबध आढळतो. या संबंधांमध्ये असहाय्यतेला आळा घालण्याची मोठी क्षमता आहे.

### उपलब्धतेचे तत्त्व

१९९८ मधील निवारा कार्यसूचीत म्हटले आहे, की 'पुरेसा निवारा म्हणजे डोक्यावर छप्पर असण्याबरोबर आणखी बरेच काही आहे. पुरेसा अवकाश, भौतिक उपलब्धता, पुरेशी सुरक्षितता, भाडेपट्टीची शाश्वती (...) पुरेशा साधनसुविधा, पाणी पुरवठा, वैयक्तिक स्वच्छता (...) परिसर व आरोग्यसंबंधित घटक यांची सुयोग्य गुणवत्ता आणि कामाच्या बाबतीत सुयोग्य स्थान व मूलभूत सोयी हे सर्व त्यात येते आणि ते परवडणाऱ्या किंमतीत हे सर्व मिळायला हवे.'

मानवी हक्क कायद्यानुसार अन्न, वस्त्र व उपजीविका देणे, हा शासनाने केलेला 'थोर उपकार' नसून नागरिकाचा अधिकार आहे. मानवी अधिकारांची वैश्विक घोषणा, नागरी व राजकीय अधिकारांचा आंतरराष्ट्रीय करारनामा आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांचा करारनामा, अशा प्रमुख मानवाधिकार करारांवर भारताने सह्या केलेल्या असल्याने मानवाधिकार अस्तित्त्वात आणण्यासाठी भारत प्रयत्नशील असतो आणि या अधिकारांच्यात पुरेसा निवारा समाविष्ट आहे. भारतीय राज्यघटनेच्या २१व्या कलमामध्ये सर्व नागरिकांना 'जीवनाचा अधिकार' प्रदान करण्यात आला आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने विविध निकालपत्रांमध्ये ग्वाही दिली आहे की 'कोणत्याही सुसंस्कृत समाजात जगण्याचा अधिकार म्हणजे अन्न, पाणी, ठाकठीक परिसर, शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि निवारा यांचा अधिकार.' 'निवाऱ्याचा अधिकार' प्राप्त करण्यासाठी, विशेषत: गरिबांना उपजीविका, वित्तसहाय्य व तंत्रज्ञान आणि यांबरोबर निवारा विकासासाठी योग्य क्षमता, ज्ञान व कौशल्य यांची प्राप्ती व्हावी लागते.

### संकटांपासून सुरक्षितता मिळण्याचे तत्त्व

देशातल्या एकूण निवासस्थानांपैकी जवळ जवळ १% (सुमारे १५ लक्ष) घरे दर वर्षी निसर्गप्रकोपाचा बळी ठरत असतात. स्वदेशी शहाणपणाकडे डोळेझाक आणि सुरक्षित रचना व बांधकामप्रथा यांकडे दुर्लक्ष यांमधून उद्भवणाऱ्या अपूर्ण तयारीमुळे अनेक कुटुंबे बेघर व असहाय्य झाली आहेत. यात गरिबांची स्थिती जास्त वाईट आहे. सृष्टीला धोकादायक ठरणाऱ्या प्रथांनी ग्रामीण गरिबांच्या

असहाय्यतेत भर घातली आहे. संकटाचा घाला पडण्यापूर्वी सोप्या दक्षता घेतल्या, तर जीवन व मालमत्ता यांची केवढी तरी हानी टाळता येईल. निवाराविकासात कुटुंबे आणि घरे यांच्या सुरक्षिततेला योग्य ते महत्त्व मिळण्याला पर्याय नाही. एकेक घर व सामुदायिक आश्रयस्थाने सुरक्षित राखल्यास संकटांमधून होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी करता येईल.

**संसाधनांची कार्यक्षमता व शाश्वतता यांचे तत्त्व**

संसाधनांची कार्यक्षमता व शाश्वतता यांच्या तत्त्वाचा संबंध पर्यावरणीय, सामाजिक व आर्थिक मुद्यांमध्ये अल्प व दीर्घ कालखंडात संतुलन साधण्याशी आहे. त्यात निवारा विकासात राबवल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सर्व (सामाजिक, नैसर्गिक, मानवी व वित्तीय) संसाधनांचा समावेश होतो आणि त्यांचा शाश्वत पद्धतीने विनियोग केला जातो. या संसाधनांची गुंतवणूक शाश्वत रीतीने होऊन त्यातून अधिकाधिक लाभ मिळेल, याची हमी हे तत्त्व घेते. निवाराविकास व बांधकाम उपक्रम यांचा नैसर्गिक परिसरावर प्रचंड प्रभाव पडत असतो. जमिनीचा वापर, नैसर्गिक संसाधनांचा विनियोग व कचऱ्याची विल्हेवाट यांच्यामुळे बांधकाम हे परिसराच्या दृष्टीतून एक आव्हानात्मक काम ठरते. निवाराविकासाचे सामाजिक व आर्थिक लाभ पहाता परिसरावर होणारे अनिष्ट परिणाम किमान पातळीवर राखणे महत्त्वाचे आहे.

स्थानिक मानवी संसाधनांचा वापर प्रभावी रित्या केल्यास कार्यमग्न स्थितीतील क्षमताविकसनाच्या माध्यमातून त्यांचा स्तर उंचावतो. नैसर्गिक व मानवी, अशी दोन्ही संसाधने परिणामकारकरित्या व सावधानतेने वापरल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेत सकारात्मक बदल घडून येऊ शकतो, हे उघड आहे. अशा संलग्नतेतून स्थानिक विकासामध्ये भरीव आवर्तने निर्माण होऊ शकतात.

## ४. विशिष्ट कृतिक्षेत्रे

पुढील कृतिक्षेत्रांमध्ये सुनियोजितपणे प्रयत्न व्हावेत अशी शिफारस हे धोरण करीत आहे:

### ४.१ जमीन – उपलब्धता व व्यवस्थापन

निवाराविकासासाठी बाकी सगळ्याच्या अगोदर जमीन उपलब्ध असायला हवी. यापूर्वी कित्येक कुटुंबांना सरकारी अनुदाने वा सवलती यांचा लाभ घेता आला नव्हता, कारण त्यांच्यापाशी जमीन नव्हती. जमीन उपलब्ध नसल्याने अशा कुटुंबांना सरकारी पाठबळ मिळू ाकत नाही आणि इतर पाठबळाचाही परिणामकारक वापर करता येत नाही. अशा कुटुंबांना वाऱ्यावर न सोडता त्यांना पुरेशा प्रमाणात जमीन्ुपलब्ध करून देणे व भाडेमुदतीची शाश्वती देणे, याकडे या बाबतीतल्या धोरणाने लक्ष दिले पाहिजे. जंगलातील भूमीवर वसलेल्या आदिवासींसारख्या  काही गटांचे हितसंबंध जरी नैसर्गिक परिसराच्या विरुद्ध भासत असले; तरी पंचायत राज्याच्या संस्थांनी (पीआरआय) गरिबांतल्या गरिबांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याची भूमिका बजावायलाच हवी. जमीन उपलब्ध करून देण्यातून संपत्तीची निर्मिती आणि तिचे संवर्धन यांची उपकारक आवर्तने जन्म घेतील आणि दीर्घकालीन दौर्बल्य व दारिद्र्य यांवर आघात होईल. पीआरआय भूमीहीनांना निवाराविकासासाठीजमीन उपलब्ध करून देतील. वसती करण्याच्या स्तरावर जमिनीचा वापर, तिचे नियोजन व व्यवस्थापन यांतून गावच्या जमिनीचा गृहनिर्माण, कृषी व ग्रामोद्योगविकास यांसाठी प्रभावी वापर होईल. सुयोग्य भूमीसुधारणांमधून ग्रामीण निवाराविकासाला प्रचंड प्रमाणात चालना मिळेल.

१. ग्राम पंचायत एक ‘भूसूची’ बनवून स्वत:पाशी ठेवेल. तिच्यात खाजगी मालकीची, सार्वजनिक वापरातली आणि चराऊ व पडीक, अशा दोन्ही प्रकारची सामायिक जमीन, यांचे क्षेत्रफळ व स्थान यांची नोंद असेल. याचबरोबर पंचायतीकडे भूमीहीन व बेघर यांची नोंद देखील राहील. या नोंदी जनतेच्या माहितीसाठी गाव व जिल्हा, दोन्ही पातळ्यांवर सुलभ रीतीने उपलब्ध असतील. जमिनीचा आराखडा बनवणे व तिच्या मालकीची नोंद ठेवणे यांसाठी कर्नाटकाप्रमाणे वेबआधारित प्रणालीसम तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून घेता येईल. ही प्रक्रिया प्रथम दक्षिण भारतात पूर्णत्वास क्रमाक्रमाने अनुकरण करण्यास योग्य उदाहरण नेऊन उत्तरेतील राज्यांसमोर म्हणून ठेवता येईल.

२. जमिनीचा वापर, गृहनिर्मितीचे नियोजन व व्यवस्थापन, नागरी सोयीसुविधा, समाजसंबंधित व उपजीविकेशी निगडित सोयीसुविधा, औद्योगिक वापर व स्थानिक स्तरावरील संस्थात्मक वापर यांची जबाबदारी स्थानिक पंचायंतीची राहील. या सर्वांची योजना ग्रामसभेच्या संमतीने तयार करून जिल्हा नियोजनात सामील करण्यासाठी पाठवली जाईल.

३. स्थानिक योजनेत भूमीहीनांच्या घरांसाठी काही जमीन राखून ठेवावी लागेल, जी प्रत्येक गावात सुमारे १० ते २५ % असेल. भूमीहीनांना घरे देण्यासाठी ग्रामपंचायतीला जमीन देणगी दिली जावी, यासाठी करसवलती दिल्या जातील. विशेषत: कमकुवत गटांसाठी नियमबाह्य मालकीखतांना नियमात बसवण्याची मोहीम राज्याच्या महसूल खात्याला राबवावी लागेल.

४. स्थानिक पंचायतीने  जमिनीची जोडणी व विकास पार पाडावा यासाठी उत्तेजन दिले जाईल. प्रमुखपदी स्त्री असलेली कुटुंबे, अपंग, निसर्गप्रकोपामुळे बेघर झालेले लोक आणि सध्या जंगलासारख्या नैसर्गिक संसाधनांना थेटपणे विरोधी असणाऱ्या घरात रहाणारे लोक; अशा, गावातील दुर्बल घटकांना घरांसाठी सार्वमताद्वारे जमीनवाटप करण्याचे काम ग्रामपंचायत करू शकेल.

५. ग्रामीण संदर्भात जमीन म्हणजे तिच्यावर घरासोबत गोठा, वगैरे असणारच. राज्यसरकारांनी हा अधिकार भूमीहीनांना मिळवून देणे गरजेचे आहे. हे करताना अनूसूचित जाती–जमातीतील (एससी व एसटी) लोकांवर विशेष भर द्यावा लागेल.

६. निसर्गप्रकोपाचे बळी ठरलेल्यांना जमिनीचे योग्य पुनर्वाटप करण्याचे काम राज्य सरकार ग्रामपंचायतीला सोबत घेऊन चालू ठेवेल. अशी जमीन सुरक्षितता, स्थानिक उपजीविका आणि गुणवत्ता व आकार यांची किमान पूर्तता या निकषांवर समाधानकारक असणे आवश्यक आहे. ग्रामसभेशी सल्लामसलत करून ग्रामपंचायतीच्या माध्यमाद्वारे जमिनीचे एकत्रीकरण व भागीदारी करण्यासारख्या जादा सक्षम पर्यायांसह गृहनिर्मिती व मूलभूत सेवांवाठी जमीन संपादन करण्याचे काम सार्वजनिक कार्यसंस्था करतील. या प्रक्रियेत, ज्या सार्वजनिक व खाजगी कृतियोजनांना जमीन संपादनाची गरज आहे, त्यांच्या बाबतीत जमिनीच्या उपलब्धतेसाठी कायद्याचा आधार आहे की नाही, याची छाननी व मूल्यमापन प्रथम केले जाईल. जमिनीचा बेकायदेशीर ताबा व जमिनीवरील अतिक्रमणे यांचा बंदोबस्त करून ग्रामपंचायतीने तयार केलेल्या सूचीनुसार कमकुवत घटकांना जमिनीचे पुनर्वाटप करावे लागेल.

### ४.२ वित्तसहाय्याची उपलब्धता

निवाराविकासासाठी कर्जसहाय्य अपरिहार्य आहे. अलीकडच्या काळात अल्पपातळीवरील कर्जव्यवहारात बचतगटांना मिळालेल्या उघड यशाचा अपवाद वगळता कर्ज देणारे इतर सर्व स्रोत विशेषत: गरिबांची पिळवणूक करणारे असतात. उलट, वित्तसहाय्य देणाऱ्या औपचारिक संस्था अजूनही फार कमी असून ग्रामीण जनतेला दुर्लभ आहेत.वित्तीय संस्था ग्रामीण भागाला कर्जपुरवठा करण्याला प्रवृत्त होतील, अशी स्थिती निर्माण करणे महत्त्वाचे आहे. कर्ज मिळवण्याचे मार्ग लवचिक व सहजी उपलब्ध असण्याची गरज आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील अनियमित उत्पन्न व तेथील जनतेकडील तुटपुंजी गंगाजळी, अशा गोष्टी लक्षात घेऊन कर्ज देणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीत बदल होण्याची देखील आवश्यकता आहे. समाजपातळीवरील कर्जपद्धती यशस्वी होताना दिसत असल्याने आशेला जागा आहे. समाजघटकांनी स्वयंस्फूर्तीने बचतीचे व गटांद्वारे कर्ज मिळवण्याचे अनौपचारिक मार्ग शोधून काढले आहेत. ग्रामीण भागातील परिस्थितीला सामोरे जाऊन कर्ज देण्याच्या इतर अभिनव पद्धती तयार करून देण्याची गरज आहे. निवाराविकासाची सांगड गरिबांना उत्पन्नाची संधी मिळवून देण्याशी घालता आली, तरच परतफेड यशस्वी होण्याची शक्यता आहे.

१. निवाराविकासासाठी सर्वसामान्य जमिनी, जंगलेव साधनसुविधांची देखभाल, यांच्यामधून निधी उभारण्याचा अधिकार गावशासनाला असेल.

२. अत्यंत गरीब लोकांच्या घरांसाठी निधी उभारणाऱ्या गावशासनांना सरकारी करधारणांमध्ये सवलती दिल्या जातील. परवडणाची, किफायतशीर, ऊर्जेची बचत करणाऱ्या घरांना, आपत्तीरोधक बांधकामाला उत्तेजन देण्यासाी सुद्धा सवलती दिल्या जातील.

३. या क्षेत्रातील गुंतवणूक वाढावी म्हणून वित्तपुरवठा व सवलती यांच्या पातळीवर गृहनिर्मिती व पायाभूत सोयीसुविधा यांना समान गणले जाईल.

४. निवाराविकासाच्या बाबतीत जागृती निर्माण करण्यासाठी बँका व वित्तीय संस्था गुंतवणूक करतील आणि स्वयंसेवी संस्थांसारख्या मध्यस्थ संस्थांद्वारे कर्जयोजना राबवतील.

५. पिकांचे हंगाम व या व्यवसायातील उत्पन्ननिर्मितीची इतर चक्रे यांची दखल घेऊन भारतीय रिझर्व बँक (आरबीआय) / राष्ट्रीय गृहनिर्माण बँक निकामी मालमत्तेचे (नॉनपरफॉर्मिंग ॲसेट्स) स्वतंत्र निकष ठरवतील. उत्पन्नाची गती व परतफेडीची क्षमता यांच्यानुसार कर्जफेडीचे वेळापत्रक ठरवण्याची मुभा कर्जसंस्थांना असायला हवी.

६. अखेरचा कर्ज दर विशिष्ट मर्यादेत बसवल्यास ग्रामीण व (गरिबांसाठी) निवाराविकास, यांच्या संदर्भात बँकांना पुनर्वित्तसहाय्य पुरवण्यासाठी नाबार्डच्या अधिपत्याखाली एक राष्ट्रीय ग्रामीण निवारा निधी निर्माण करावा, ज्यासाठी केंद्र शासनाचे रु.५०० कोटींचे प्राथमिक अंशदान असावे, अशी शिफारस करण्यात येत आहे. हा दर स्पष्टपणे नमूद करण्याऐवजी नाबार्ड दरापेक्षा अमुक मूलभूत अंश जास्त, अशा तऱ्हेने निश्चित करता येईल. हा दर नाबार्ड दरापेक्षा (५००) मूलभूत अंश जास्तपर्यंत, असा ठेवता येईल. मध्यस्थ संस्थांच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या बँकांना ग्रामीण लाभधारकांपर्यंत पोचण्यासाठी जादा वरकड खर्चाची तरतूद करावी लागेल. या निधीमध्ये खाजगी क्षेत्राचे, विशेषत: बांधकाम साहित्य उद्योगाचे देखील अंशदान असेल. ग्रामीण भागातील गोरगरिबांना कर्जपुरवठा करऱ्याचे भार्ग विकसित करण्यासाठी सुद्धा या निधीचा विनियोग होऊ शकेल, ज्या योगे ग्रामीण भागातील गृहवित्त सहाय्याचे दर नागरी भागातील दरांच्या पातळीत वा त्यांच्या खाली रहातील.

७. ग्रामीण गृहनिर्मिती / निवारा क्षेत्राला कर्जपुरवठा करणाऱ्या बँकांसमोर अनियमित / अनिश्चित उत्पन्न स्रोतांमुळे निर्माण होणाऱ्या जोखमी हलक्या करण्यासाठी नाबार्डअंतर्गत एक ''जोखीम निधी'' निर्माण करण्यात येईल, ज्यामध्ये रु.५०० कोटींची प्राथमिक रक्कम (केंद्र शासनाने दिलेली) असेल. जोखीम निधीची रक्कम वाढवण्यासाठी व्यापारी बँका योगदान देतील, ज्याची रक्कम प्राधान्यक्षेत्रासाठी (प्रायॉरिटी सेक्टर) असलेले लक्ष्य गाठण्यात बँक जेवढी कमी पडेल, त्याच्या विशिष्ट प्रमाणात असेल.

८. ग्रामीण गृहनिर्मिती / निवारा यांना मिळणाऱ्या कर्जाच्या प्रमाणात बँका वाढ करतील. विविध कमकुवत गटांना द्यावयाच्या कर्जासाठी लक्ष्य ठरवून ते जाहीर करण्याचा विचारही त्या करतील. सध्या रु.१५ लाखांवरील सर्व प्रकारच्या कर्जांमध्ये प्राधान्य क्षेत्राचा वाटा (गृहनिर्मितीसाठी) आहे. यामुळे कर्जवाटप मध्यम उत्पन्नगट व छोट्यामोठ्या शहरांलगत रहाणारे, यांच्यापुरते रहाते. दुरुस्ती व सुधार यांच्यासाठीची मर्यादा नागरी भागाकरता रु.२ लाक व ग्रामीण भागाकरता रु.१ लाख आहे. ग्रामीण भागातील वंचितांपर्यंत पोचण्यासाठी रु.२ लाखांचे स्वतंत्र लक्ष्य व सुधार करण्यासाठी रु.५०,०००ची मर्यादा सुचवली जाईल.

९. संस्थात्मक गृहवित्त व्यवस्था समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, याकरता बँका व वित्तसंस्था यांच्या कर्जासाठी जमिनीच्या मालकीसंदर्भात ग्रामशासनाच्या प्रमाणपत्राला पुरेसा लेखी पुरावा मानण्यात येईल.

१०. निवारा कर्जाला विम्याचे संरक्षण असेल आणि त्याचा एक हप्ता बँक स्वत:च देईल वा शासन व प्राथमिक कर्जसंस्था वाटून घेतील.

११. ग्रामीण जनतेतील दुर्बल घटकांना होणारा, जोखीम व अंमलबजावणी यांबाबतीत तुलनेने जास्त खर्चिक असलेला कर्जपुरवठा वित्तसंस्थांनी वाढवावा, यासाठी बँका, सार्वजनिक वित्तसंस्था, वगैरेंना प्राप्तिकर अधिनियमांतील कलम ३६ (१) (ग्राम) खाली मिळणारा लाभ गृहवित्त कंपन्यांना (एचएफसी) सुद्धा मिळावा.

१२. प्राथमिक कर्जसंस्थांनी ग्रामीण समाजातील दुर्बल घटकांना वाढीव कर्ज द्यावे यासाठी स्वयंसहाय्यता गट / स्वयंसेवी संघटना व सूक्ष्मस्तरीय वित्तसंस्था यांच्या माध्यमातून सध्या उपलब्ध असलेली संस्थात्मक कार्यप्रणाली गरिबांना मिळणाऱ्या गृहकर्जांमध्ये कृतिशीलपणे सहभागी होईल.

१३. सूक्ष्मस्तरीय, विशेषत: ग्रामीण गरिबांना होणाऱ्या, कर्जवाटपाला उत्तेजन दिले जाईल. विशेषत: संस्थात्मक कर्जसहाय्याचे निकष पूर्ण न करू शकणाऱ्या कुटुंबांना त्यात वाटा मिळावा, यासाठी गृहनिर्माण क्षेत्राला होणाऱ्या सूक्ष्मस्तरीय कर्जवाटपाला जोरदार उत्तेजन दिले जाईल. गरीब कुटुंबांना स्वयंसहाय्यता गटात एकत्र आणून त्यातून कर्जवाटपाला सामाजिक स्वरूपाचे पूरक तारण उपलब्ध व्हावे, यासाठी प्रयत्न केले जातील.

१४. उपजीविका व उत्पन्ननिर्मितीच्या योजना, यांची सांगड घरबांधणी व निवाराविकास यांसाठी बचत करण्याशी घातली जाईल.उपजीविका निर्माण करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटांकडून बचत उभारली जाईल आणि ती थेटपणे बँकेशी जोडलेल्या सभासदांच्या वैयक्तिक कर्जफेडीसाठी पूरक तारण ठरेल (परचफेडीची जबाबदारी वैयक्तिक कर्जधारकाचीच राहील).

१५. ऊर्जेचा कार्यक्षम वापर करणाऱ्या किफायतशीर बांधकाम साहित्याची निर्मिती करणाऱ्यांना शासकीय वसुलीसंदर्भात प्रोत्साहन दिले जाईल.

१६. उपजीविका व समाजनिगडित पायाभूत सोयीसुविधांच्या निर्मितीसाठी अनुदान देण्याची जोड अगदी तळाच्या गरिबांसाठीच्या गृहविकासासाठी आधारभूत कर्ज व अनुदान देण्याशी घातली जाईल.

## ४.३ वैधानिक व नियामक सुधारणा

निवाराविकासाच्या प्रक्रियेला वेग देण्यासाठी मूलभूत स्वरूपाच्या वैधानिक व नियामक सुधारणा कराव्या लागतील, ज्यांमधून निवारानिर्मिती प्रक्रियेला खंबीर आधार पुरवतील. शासनाची भूमिका अडचणींचे निवारण करण्याची असावी; जेणेकरून निवाराविकासाच्या एकंदर प्रक्रियेत खाजगी क्षेत्राचा व इतर हिस्साधारकांचा सहभाग प्रभावी ठरेल. संवेदनशीलता व क्षमता यांचा विकास घडवून आणला, तरच हे शक्य आहे. याचबरोबर या सगळ्याला परिणामकारक व पारदर्शक देखरेख व्यवस्थेची नितांत गरज आहे.

निवाराक्षेत्रावर नियंत्रण ठेवणाऱ्या जमीनधारणा हक्क, जमीन वापर, बांधकाम नियम व दंडक आणि किंमतनियंत्रण, यांसारख्या सर्वसाधारण वैधानिक व नियामक बंधनांचे पुनर्मूल्यांकन होणे महत्त्वाचे आहे. विविध शासकीय विभाग व संस्था यांमधील सहयोग आणि विकास कार्यक्रम यांमध्ये एकरूपता आणणे अपरिहार्य आहे. वैधानिक व नियामक सुधारणांमुळे पुरवठ्याच्या बाबतीतील बंधने दूर होतील आणि ग्रामीण भागात सर्वांना निवाऱ्याची समान संधी मिळण्याची शक्यता निर्माण होईल.

१. ग्रामीण निवाऱ्याच्या आराखड्यांचा विकास, बांधकाम आराखड्यांना मंजुरी व दंडकांचे पालन, यांची जबाबदारी पंचायत राज्यसंस्थांवर राहील. इमारत आराखड्यांना मंजुरी मिळवण्याची पद्धती सुलभ केली जाईल, म्हणजे नियम व दंडक यांच्या कठोर पालनाद्वारे विलंब टाळता येईल. याचबरोबर मान्यताप्राप्तीच्या पद्धतीत सुलभता आणून एकूण व्यवस्ता उपभोक्ताभिमुख बनवली जाईल.

२. जिल्हा पातळीवरील नियोजन व्यावसायिक नियोजनकाराच्या मदतीने जिल्हा पंचायत करेल.

३. ७३व्या घटना दुरुस्तीतील २४३झेडडी व झेडई यांना अनुसरून, केंद्र व राज्य पातळीवरील वित्त आयोगांच्या वस्तुनिष्ठ प्रक्रियांद्वारे उपलब्ध झालेला निधी आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारी वित्तीय व पार्यावरणीय संसाधने, यांच्या आधारे पंचायती स्थानिक स्वरूपातील विश्लेषक, संख्यासंबद्ध व अवकाशीय आराखडे बनवतील. यांमधून जिल्हा नियोजन समित्या जिल्हा स्तरीय आराखडे तयार करतील. यांची तार्किक परिणती राज्य व राष्ट्रीय नियोजन अधिकाऱ्यांच्या हस्ते अवकाशीय आराखड्यांमध्ये होईल. अशा रीतीने स्थानिक शासनाला नियोजन व प्रशासन यांच्या माध्यमातून भूमी, जलस्रोत व जंगले यांसारख्या नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण राखता येऊन त्यांचा विनियोग शाश्वत व पारदर्शक पद्धतीने होण्याची हमी घेता येईल.

४. जिल्हा गृहनिर्मितीचा कृतिआराखडा बनवण्यासाठी कालमर्यादा घातली जाईल आणि चालू पंचवार्षिक योजना पूर्ण होण्यापूर्वी तो तयार असेल. नवीन बृहद् आराखड्याच्या (मास्टर प्लान) नोंदणीकरणासाठीचे नियम व पद्धती यांच्यात सुलभता आणली जाईल.

५.केंद्रशासननिर्मित 'ग्रामीण निवारासंबंधी पंचायत कायदा प्रारूप' स्वीकृत करावे, अशी विनंती सर्व राज्यांना करण्यात येईल. गृहनिर्माण आणि किमान प्रमाण व गुणवत्ता, यांच्याशी संबंधित तरतुदींची छाननी या प्रारूपाच्या प्रकाशात करून राज्य व जिल्हा पातळीवरील अंमलबजावणीच्या संदर्भात नेमकेपणाने शिफारशी करणे शक्य होईल. निवासस्थानी होणाऱ्या उपजीविकेशी निगडित उपक्रमांचा विचार करून घर–गोठा, वगैरेसाठी आवश्यक जमिनीच्या क्षेत्रफळाचे, तसेच ग्रामीण भागातील मूलभूत सेवांचे किमान गुणवत्ता निकष विकसित करून त्यांची अंमलबजावणी केली जाईल.

६. शहराभोवतालच्या, तसेच शहरीकरणाखालील गावांमधील गृहनिर्मितीत गुंतवणुकीला उत्तेजन मिळावे यासाठी राज्यांमधील भाडेनियंत्रण कायद्यात बदल केले जातील.

७. संबंधित जमीन धोरण व जमीन वापराचे नियम, यांमधून जमिनीचे एकत्रीकरण, सामायिकीकरण व सहवापर यांसाठी वैधानिक आधार प्राप्त होईल. जमिनीचे एकत्रीकरण, सामायिकीकरण व सहवापर या प्रक्रियेत पंचायत राज्य संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

८. सार्वजनिक–खाजगी भागीदारीतील गृहनिर्मिती योजनांचा भाग असण्याचे स्थान स्वयंसेवी संस्था व समाजाधारित संघटना यांना प्रदान केले जाईल. गावात काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्था ग्रामसभेस उत्तरदायी असतील.

९. देशातील ग्रामीण भागात सुद्धा गृहविमा उपलब्ध असावा, यासाठी विमा क्षेत्राशी संबंधित कायद्यात बदल केले जातील. फसव्या देवघेवींना आळा घालण्यासाठी मालकीखतांच्या विम्याला उत्तेजन दिले जाईल.

१०. गरीब ग्रामीण कुटुंबांना मुद्रांक शुल्क माफ केले जाईल.

११. माहिती तंत्रज्ञानाचा परिचय असल्याने स्थावर मालमत्तेच्या बेचनपत्राच्या नोंदणीच्या कार्यपद्धतीत सुलभता आणण्याची गरज राज्यांना पटवून दिली जाईल. भारतीय नोंदणी अधिनियम, त्या त्या राज्यांनी प्रसृत केलेले नियम, परिपत्रके, मार्गदर्शक सूचना व शासकीय आदेश यांच्यात ठरावीक मुदतीत बदल केले जातील. नोंदणी प्रक्रियेची पद्धती सुलभ केली जाईल आणि जमिनीच्या कोणत्याही व्यवहारासाठी लागणारे ना–भारपत्र व इतर तपशील तत्परतेने उपलब्ध केले जातील.

१२. राज्यांचे व इतर शासनांच्या जमीन महसुलाच्या दप्तराचे विशिष्ट कालमर्यादेत संगणकीकरण केले जाईल आणि ते जीआयएस प्रणालीचा भाग होईल.

१३. ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक अधिनियम लागू होतात, तेथे नगर व अंतर्भाग (टाउन अँड कंट्री) नियोजन अधिनियम (अथवा इतर कोणताही समान अधिनियम) लागू होईल. संबंधित राज्य सरकारे अधिनियमांच्या त्या त्या तरतुदींमठ्धध्ये बदल करतील आणि याचप्रमाणे नगररचना व विकास अधिनियम यांखाली येणाऱ्या विकास क्षेत्रात कृषी जमीनधारणेवरील कमाल मर्यादा लागू होणार नाहीत.

१४. शाश्वत बांधकामप्रथांचा स्वीकार व्हावा यासाठी राज्य सरकारांना मार्गदर्शक सूचना व नियम विकसित करण्याची गरज भासेल.

१५. वसाहतींमधील स्वच्छ परिसर व गुणवत्तापूर्ण जीवन हे विविध कायदे व नियामक अधिकाऱ्यांमधील सुसूत्रता, यांवर अवलंबून असते. नियोजन प्रक्रियेमध्ये नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, घन कचऱ्याची विल्हेवाट, सौर ऊर्जेचा वापर, पर्जन्यजल संधारण आणि वीज पुरवठा यांच्या धोरणांमध्ये एकवाक्यता आणण्याची गरज आहे. अंतर्गत पुरवठा / वितरण लाइन्स प्रदूषणमुक्त राखण्याची जबाबदारी विकासक / स्थानिक संस्था यांची राहील.

१६. कोणतीही वसाहत जमीन, पाणी, जंगल आच्छादन व ऊर्जा यांसारख्या नैसर्गिक संसाधनांच्या अमर्याद वापराचा बोजा सहन करू शकत नाही. या संसाधनांच्या वापराचे दंडक व त्यांच्या संरक्षणाची तंत्रे स्पष्ट केली जातील आणि त्यांची अंमलबजावणी सुद्धा केली जाईल.

१७. ऊर्जावापर व प्रदूषण यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ऊर्जेचा अल्प वापर करणारी तंत्रे व साहित्य यांचा उपयोग केला जाईल. निवासी इमारतींमध्ये सौर ऊर्जेवर पाणी तापवणे,अन्न शिजवणे आणि प्रकाशव्यवस्था करणे, अशा पुनर्वापर शक्य असलेल्या ऊर्जास्रोतांच्या वापरासाठी ार्गदाक सूचना व नियम तयार केले जातील. बांधकामात वापरण्यासाठी दुय्यम (सेकंडरी) लाकडाची लागवड करण्याला उत्तेजन दिले जाईल.

१८. कृषी व औद्योगिक टाकाऊ पदार्थांमधून तयार केलेल्या बांधकाम साहित्याचा व साधनांची वापर करण्यात आणि त्यांचा प्रचार करण्यात शासन पुढाकार घेईल. जेथे हे साहित्य व ही साधने उपलब्ध होतील, तेथील सर्व सरकारी गृहनिर्माण व बांधकाम प्रकल्पांमध्ये त्यांचा वापर वाढत्या प्रमाणात व्हायलाच हवा. अशा प्रकारच्या अभिनव व पर्यावरणास अनुकूल गोष्टींना शासन करवसुलीत सवलती देईल आणि मोठ्या प्रमाणावर ऊर्जा संपवणाऱ्या वस्तूंवर जादा कर लावेल.

१९. भूकंप, पूर व चक्रीवादळे यांचा धोका असलेले भौगोलिक विभाग देशाच्या धोक्याखालील भागांच्या नकाशात दाखवण्यात आले आहेत. संकटप्रतिरोधक बांधकाम व जमीनवापर नियोजन यांच्या दंडकांचे पालन सर्व राज्य शासने व केंद्रशासित प्रदेश निरपवादपणे करतील.

२०. गरीब / दुर्बल / भेदभावाचा बळी ठरलेले स्त्रीपुरुष यांना प्रदान करण्यात आलेल्या घरांची व जमिनीची पुनर्विक्री करण्यावर विशिष्ट काळापर्यंत बंदी राहील.

### ४.४ **पायाभूत सोयीसुविधा: 'गृहनिर्मिती'मधून 'निवाऱ्या'ला बळकटी**

वसाहतीत पक्की घरे, शाळा आणि आरोग्यव्यवस्था, उपजीविकेच्या सोयीसुविधा व नैसर्गिक संसाधनांचा भक्कम पाया, यांच्या साथीला वहातूक व दूरसंपर्क सुविधा किती प्रमाणात आहेत, यावरून तेथील समाज किती 'विकासित' व स्थिर आहे, हे ठरत असते. ग्रामीण भागाकडे, विशेषत: उत्तर भारतातील राज्यांमधल्या भागाकडे विकासाच्या दृष्टीतून विविध हिस्साधारकांनी तातडीने लक्ष पुरवण्याची गरज आहे. त्यांचा हस्तक्षेप गाव आणि कुटुंब, अशा दोन्ही पातळ्यांवर हवा आहे. गावपातळीवर असे दिसून येते की शाळा, उपजीविका केंद्रे, रस्ते व वीज अशा ग्रामीण साधनसुविधांमधील गुंतवणुकीची कदाचित कर्जापेक्षा जास्त तातडीची गरज आहे. पायाभूत साधनसुविधांचा विकास झाल्यास गुंतवणूक आकर्षित होईल, स्थानिक कौशल्याला व क्षमतेला उत्तेजन मिळेल, ग्रामीण भागाचे एक बाजारपेठ म्हणून व आर्थिक मूल्य वाढेल आणि त्याचबरोबर कर्जपुरवठा अधिक अर्थपूर्ण बनेल.

१. देशाच्या ग्रामीण भागातील पायाभूत साधनसुविधांची इच्छित निर्मिती आणि तिच्यातील सुधारणा होताना लिंगभेदाची भावना दूर कशी राहील आणि या साधनसुविधा आजच्या काळातील स्त्रीपुरुषांच्या अपेक्षांना अनुरूप कशा होतील, याचे मार्ग शोधण्याची गरज आहे.

२. सर्व मानवी वसाहतींमधील पायाभूत साधनसुविधांमध्ये सुरक्षित पाण्याचा पुरेसा पुरवठा, स्नान व वैयक्तिक स्वच्छतेच्या सोयी, कचऱ्यावरील प्रक्रिया व त्याची विल्हेवाट यात कार्यक्षमता, सोयीस्कर सार्वजनिक वहातूक व्यवस्था, पुरेसा वीजपुरवठा व ऊर्जेची उपलब्धता; आणि याबरोबर स्वच्छ व आरोग्यमय वातावरण यांचा समावेश आहे. पायाभूत सुविधांमध्ये शैक्षणिक सोयी (शाळा व महाविद्यालये, ग्रामीण संशोधन संस्था), करमणुकीची साधने (मैदाने, सार्वजनिक बागा, क्रीडांगणे व मनोरंजन केंद्रे), खेळांची मैदाने, वैद्यकीय सोयी (रुग्णालये व तत्संबंधित आरोग्यसेवा), रेल्वे, रस्ते व जलमार्ग यांद्वारे जोडणी आणि 'इकनेक्टिव्हिटी' यांचा समावेश आहे. अखंडित व परवडणारा वीजपुरवठा, शेतीबाहेरील उपक्रमांसाठी कार्यकक्ष, गुरांचे गोठे, पाणी पुरवठा व कचाविल्हेवाटीची व्यवस्था, यासारख्या उपजीविकानिगडित साधनसुविधांचा शाश्वत वसतीस्थानांमध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

३. पायाभूत साधनसुविधांचे नियोजन व त्यांचे व्यवस्थापन स्थानिक गरजांनुसार होईल व त्यात शाश्वत उपजीविकेच्या संधींची निर्मिती होईल, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी पंचायत राज्य संस्थांवर राहील.

४. वर (२) मध्ये उल्लेखलेल्या सर्व क्षेत्रांच्या विकासाकरता साधनसुविधांची निर्मिती करण्यासाठी सार्वजनिक–खाजगी भागीदारीचा मार्ग चोखाळला जाईल. साधनसुविधा क्षेत्राकडे खाजगी भांडवलासह इतर संसाधने आकर्षित व्हावीत यासाठी बृहद् आर्थिक व्यूहरचना केली जाईल. विकेंद्रित वीजनिर्मिती, जलप्रक्रिया आणि कचराप्रक्रिया व विल्हेवाट यांमध्ये सूक्ष्म व लघुउद्योजकांनी प्रवे करावा यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

५. विविध हिस्साधारकांच्या सहभागाने वेगवेगळ्या ठिकाणच्या ग्रामीण भागांमध्ये नागरी सुविधा पुरवल्या जातील. या संदर्भात काही राज्यांतील प्रायोगिक तत्त्वावरील प्रकल्पांकडून प्रतिसाद मागवला जाईल.

६. वर (२) मध्ये उल्लेखलेल्या सर्व क्षेत्रांच्या विकासाकरता स्थानिक अधिकारी आणि खाजगी क्षेत्र, यांकडून 'स्थानिक' साधनसुविधा विकसित करण्यासाठी जे प्रयत्न होतील; त्यांना वित्तसंस्था, राज्य सरकारे व केंद्र सरकार यांच्याकडून प्रोत्साहन व पाठिंबा मिळेल.

७. वीजनिर्मिती संयंत्रे, खाणी, रेल्वे, विमानतळ अशा राष्ट्रीय स्तरावरील साधनसुविधांच्या निर्मितीसाठी जर ग्रामीण जनतेला विस्थापित व्हावे लागले; तर त्यांना मिळणारी भरपाई समान प्रमाणातील जमीन व समान आकाराची घरे, यास्वरूपातील असेल. रोख भरपाई टाळली जाईल.

### **४.५ पूर्तता कार्यपद्धतीची पुनर्रचना**

भारतातील ग्रामीण गृहनिर्मितीमधील खरे आव्हान आत्मगतीने चालणाऱ्या पूर्तता कार्यपद्धतीचा विकास, हे आहे.ग्रामीण भागातील

वास्तव पहाता, वैविध्यपूर्ण व लवचिक पर्यायांवर आधारित असलेली निवाराप्रकल्प पूर्तता प्रणालीच स्वत:च्या गतीने चालत राहू शकेल. स्थिर उत्पन्न व बचत, यांमधून घडणाऱ्या परिणामस्वरूप मागणीची (इफेक्टिव डिमांड) वानवा आणि प्रयोगक्षम, शाश्वत कर्जव्यवस्थेची अनुपस्थिती यांची युती झाल्याने अशी प्रणाली विकसित होण्यात मोठाच अडथळा निर्माण होतो. ग्रामीण गृहनिर्मितीत व्यापारी तत्त्वावरील खाजगी क्षेत्राचा सहभाग नगण्य आहे. शासनाव्यतिरिक्त या प्रक्रियेतील विविध हिस्साधारकांना बरोबर घेऊन पूर्तता कार्यपद्धती शक्य तितक्या प्रमाणात विकेंद्रित होईल, अशा रीतीने तिची पुनर्रचना करायला हवी. अलीकडल्या अनुभवांवरून असे दिसते, की बांधकामाचे योग्य साहित्य व श्रमशक्ती यांच्या स्थानिक पुरवठ्याची उद्योजकतेच्या वाटेने घडवलेली प्रयोगक्षम, फायदेशीर व्यवस्था ग्रामीण गरिबांना अधिक चांगला निवारा मिळवून देते; शिवाय यातून स्थानिक अर्थव्यवहारांमध्ये सुधारणा होण्यासारखे अन्य फायदे देखील मिळतात.

घरे, ऊर्जा व स्वच्छ पाणी यांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण करणाऱ्या गोष्टींचे रूपांतर बाजारपेठेची निर्मिती/विकास या मार्गाने मागणीत करता येते. स्वयंसहाय्यता गट आणि भले तंत्रज्ञान वापरणारे खाजगी मालकीचे सूक्ष्म उपक्रम यांनी चालवलेली ग्रामाधारित उत्पादन केंद्रे स्थापन करून लक्षणीय प्रभाव घडवून आणता येईल. बाजारपेठेचा विकास करण्यामध्ये प्रशिक्षण व सुयोग्य तंत्रज्ञानाची उपलब्धता, माहिती व बाजारपेठा यांचा आढळ असतो. शिवाय, यात गरिबांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या उत्पादनांवर भर असल्याने अल्पविकसित भागांमध्ये स्थानिक बाजारपेठांची निर्मिती व वाढ होण्यास आधार मिळतो.

१. गावपातळीवरील निवारा उपक्रमांची निश्चिती ग्रामसभा करेल; तर त्यांची अंमलबजावणी ग्रामपंचायत करेल.

२. गृहनिर्माण लोककेंद्रित असावे यासाठी सार्वजनिक संस्था व ग्रामीण गृहनिर्मिती योजना 'प्रकार प्रारूपा'ऐवजी (टाइप डिझाइन) तांत्रिक प्रमाणीकरणाचा पुरस्कार करतील.

३. स्वयंसहाय्यता गटांनी वित्तसंस्थांच्या मदतीने ग्रामपंचायतीच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या गृहनिर्माण कार्यक्रमांना उत्तेजन दिले जाईल.

४. गाव व जिल्हापातळीवरील संस्थांया अतिविशाल जाळ्याच्या मदतीने प्रयोगसिद्ध किफायतशीर बांधकाम साहित्य 'प्रयोगशाळेतून जमिनीकडे' स्थानांतरित होण्याला वेग दिला जाईल. प्राथमिक टप्प्यावर नवीन पदार्थ व तंत्रज्ञान यांचा प्रत्यक्ष वापर सार्वजनिक इमारतींमधून घडवला जाईल.

५. ग्रामीण भागातील सूक्ष्म व लघु उद्योजकांनी जिल्ह्यामध्ये निर्माण केलेले शाश्वत तंत्रज्ञान करवसुलीसंबंधित प्रोत्साहने व क्षमताविकास यांमधून उपलब्ध केले जाईल. स्थानिक स्तरावरील उत्पादने सर्वमान्य मानकांची पूर्तता करतील.

६. उद्योजकता प्रारूप सुलभपणे उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा/ग्रामपंचायत पातळीवर ग्रामीण बांधकाम केंद्रे उभारण्याची गरज आहे. ही केंद्रे स्थानिक पदार्थांवर आधारित बांधकाम साहित्याची विकेंद्रित उत्पादन केंद्रे म्हणून व बांधकाम कामगारांसाठी प्रशिक्षण केंद्रे म्हणून देखील कार्य करतील.

७. बांधकाम साहित्याच्या जिल्हा पातळीवर कोश तयार होण्याला उत्तेजन दिले जाईल. गावांमध्ये सुद्धा पंचायतीच्या नेतृत्वाखाली असेच कोश केले जातील, ज्यांना विविध संस्था/संघटना यांचे पाठबळ असेल.

८. बांधकाम साहित्य व तंत्रज्ञान यांचा उगम स्थानिक गरजा, परंपरा व संसाधने यांना अनुसरून देशीय प्रथांमधून व्हावा.

९. बांधकाम दंडक व सुरक्षिततेचे नियम यांचे पालन ग्रामपंचायतीच्या द;खरेकीखाली होईल.

१०. नव्या बांधकाम साहित्याचा समावेश राज्ये त्यांच्या दरपत्रक सूचीमध्ये करतील आणि त्यांचा जोरदार पुरस्कार करतील. विकसित संशोधनाच्या उत्पादनांचा समावेश सूचीमध्ये विशिष्ट कालमर्यादित केला जाईल, अशी अपेक्षा आहे. दरांच्या राज्यस्तरीय सूचीत जिल्हा/ग्राम पंचायतींद्वारा स्थानिक स्थितीनुसार परिवर्तन केले जाईल.

११. विविध बांधकाम घटकांचे स्थानिक स्थितीनुसार मानकीकरण करण्यावर जोर दिला जाईल, ज्यायोगे विकेंद्रित उत्पादनप्रक्रियेद्वारे वाढीव गुणवत्तेची उत्पादने स्पर्धात्मक दरांवर मिळतील.

### ४.६ क्षमता विकास

धोरणाची अंमलबजावणी प्रत्यक्षात व्हावी यासाठी विविध हिस्साधारकांच्या क्षमतेचा योग्य विकास होणे अत्यावश्यक आहे. याचबरोबर समाजाधारित कार्यक्रमांची रचना करण्यासाठी व सुरक्षित निवाऱ्याची पूर्तता होण्यासाठीशासकीय कार्याधिकाऱ्यांच्या तांत्रिक क्षमतांचा विकास होण्याची गरज आहे. स्थानिक समाजस्तरावर सुरक्षित बांधकामाचे मूल्य या विषयाबद्दल जागृती निर्माण करण्याबरोबर निवारा–आधारित उपजीविकेकडे ओढा निर्माण केल्यास ग्रामीण भारतात चांगल्या, सुरक्षित बांधकामाना सार्वत्रिक मान्यता मिळेल. बाजारपेठांची विकास पुढेही होत रहावा यासाठी कार्यपूर्तीला ज्यांचा हातभार लागतो, अशा उद्योजक व कारागीर यांच्या तांत्रिक व व्यवस्थापकीय क्षमतांचा विकास होणे अत्यावश्यक आहे.

१. सुरक्षित व परिसरानकूल निवाऱ्याच्या अधिकाराविषयी जागृती निर्माण व्हावी यासाठी ग्रामीण निवाऱ्याच्या मोहिमेला चळवळीचे स्वरूप दिले जाईल.

२. क्षमताविकास हा सर्व सामाजिक गृहनिर्माण योजनांचा, विशेषत: पर्यावरणानुकूल बांधकामाहित्य व तंत्रे यांचा पुरस्कार करणाऱ्या योजनांची, अत्यंत महत्त्वाचा भाग असेल. कुटुंबांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून बांधकामाचे नियोजन, आराखडानिर्मिती व देखरेख यांमध्ये सहभागी व्हावे, याकरता त्यांच्या क्षमतांचा विकास करण्यावर भर दिला जाईल.

३. अकुशल कामगारांमध्ये कुशलता वाढावी, यासाठी एनआरइजीएचा उपयोग प्रत्यक्ष कामातून प्रशिक्षण देण्याची संधी, असा केला जाईल.

४. ज्यांच्या घराचे जोत २० चौ. मीटरपेक्षा जास्त आहे, अशा घरांवर पंचायत प्रशिक्षणभार लागू करेल. पर्यावरणानुकूल किफायतशीर (सीइइएफ) तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या व स्वयंसहाय्यता गटांतर्फे बाधण्यात येणाऱ्या इमारतींना हा भार माफ असेल. या भारामधून बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देता येईल व त्यांना नवीन कौशल्ये शिकवता येतील.

५. गावांमध्ये निवाराकार्याची पूर्तता प्रभावीपणे व्हावी यासाठी राज्याचे कार्याधिकारी व पंचायत राज्य संस्था यांच्या क्षमतांचा अधिक विकास करण्यात येईल.

६. गवंडी, सुतार, प्लंबर व इतर कारागिरांना ग्रामीण उद्योजकांच्या पातळीवर मोजले जाईल. कौशल्यविकास व उद्योजकता यांच्या राज्यपुरस्कृत प्रशिक्षणयोजनांच्यात त्यांचा समावेश केला जाईल.

७. बांधकाम उद्योग हा स्त्रियांना काम देणारा सर्वात मोठा उद्योग आहे आणि त्याच वेळी वेतनातील भेदभावाच्या बाबतीत त्यांचे सर्वाधिक शोषणही हाच उद्योग करत असावा. याचे समाधान कौशल्य वाढवण्यात आणि स्त्रियांना मुकादम म्हणून नेमण्यात आहे. याबरोबर त्यांना कंत्राटदार होण्यासाठी उद्युक्त करायला हवे. सार्वजनिक संस्थांनी यात पुढाकार घेतील. सर्व प्रशिक्षण संस्थांनी स्त्रियांची नोंदणी प्राधान्याने करायला हवी.

८. प्रकल्पाची अंमलबजावणी करणारे अधिकारी धोकादायक अशा बांधकाम उपक्रमातील स्त्रियांची सुरक्षितता व आरोग्य यांच्यासाठी पुरेशा तरतुदी करतील. हे अधिकारी त्यांना पाळणाघरे व तात्पुरता निवास, अशा आधारभूत सेवादेखील पुरवतील.

९. संबंधित राज्यांना स्त्रिया व पुरुष, दोघांना विकेंद्रित प्रशिक्षण देण्यास सांगितले जाईल. या दिशेने चाललेल्या प्रयासांमध्ये समन्वय साधण्यासाठी प्रशिक्षण देणाऱ्या व कौशल्यविकास करणाऱ्या अनेक सरकारी योजनांमध्ये एकवाक्यता आणता येईल.

१०. बांधकाम केंद्रे स्त्रिया व पुरुष, दोगांना वकेंद्रित प्रशिक्षण देतील. या दिशेने चाललेल्या प्रयासांमध्ये समन्वय साधण्यासाठी प्रशिक्षण देणाऱ्या व कौशल्यविकास करणाऱ्या अनेक सरकारी योजनांमध्ये एकवाक्यता आणली जाईल. बांधकाम केंद्रंमधील वा खाजगी उद्योजकांकडील बांधकाम साहित्यउत्पादकांच्या क्षमतेचा विकास करण्याचे काम राज्य सरकारे तंत्रशिक्षण संस्थांद्वारे करतील.

११. तंत्रज्ञानाचा वापर, कौशल्ये व जिल्हा/पंचायत स्तरावरील क्षमताविकासाचे कार्यक्रम यांना ध्यानात ठेवून व्यावसायिक संस्थांच्या सहकार्याने क्षमतामापनाची एक नियमित प्रणाली कार्यान्वित केली जाईल. स्थानिक बांधकाम साहित्याच्या परिणामकारकतेत योग्य तंत्रज्ञानाच्या योगदानामधून वाढ करता येईल. अभिनव बांधकामसाहित्य, तंत्र व ऊर्जेचा उत्तम वापर करणारी वैशिष्ट्ये यांचा

वापर व उपयोग सर्वमान्य व्हावा यासाठी त्यांना स्थापत्यशास्त्र, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रशिक्षणसंस्था व प्रशिक्षण संस्था यांच्या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनवण्यात येईल.

**४.७ गृहक्षेत्रातील राजगाराचे प्रश्न – उपजीविका व निवारा या क्षेत्रांमधील दुवा**

संस्थात्मक वा अनौपचारिक बचत योजनांमध्ये सहभागी होणारे ग्रामीण स्त्रीपुरुष स्वत:च्या बचतीतून वा कर्ज घेऊन वित्तीय संसाधने प्राप्त करून घेऊ शकतात. सामाजिक–आर्थिक संदर्भ अनुकूल असल्यास ग्रामीण ग्राहक जे कर्ज घेतात, स्वत:ला मौल्यवान वाटणाऱ्या सेवांसाठी जादा व्याज भरतात आणि त्यांच्या बाबतीत परतफेडीची समस्या क्वचितच उद्‌भवते. गावांमधील निवारानियोजनात उपजीविकानिर्मितीचा – भौतिक साधनसुविधा, खेळते भांडवल व बाजारपेठेशी दुवा, यांचा – समावेश व्हायला हवा. बांधकाम साहित्याचे उत्पादन व बांधकामकौशल्य यांमधील उपजीविकेच्या संधी जगजाहीर आहेत. एका बाजूने परिसर स्वच्छ ठेवताना दुसरीकडे गरिबांना नोकऱ्या देणाऱ्या सॅनिटरी मालाच्या दुकानांसारख्या पूरक सेवांा पर्यायही आहेतच.

१. कोणत्याही वसाहतीच्या निरोगी वाढीला गरिबी व बेकारी अडथळा ठरतात.राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसारख्या दारिद्र्यनिवारण व रोजगार निर्मिती करणाऱ्या कार्यक्रमांची जोरदार अंमलबजावणी राज्य सरकारे व स्थानिक प्रशासन यांनी करायला हवी. उत्पन्नात भर टाकणाऱ्या उपक्रमांचा विकास, सेवाक्षेत्राचा विस्तार आणि प्रशिक्षण व कौशल्यसुधारणा यांचा अंगिकार केला जाईल.

२. स्थानिक साधनसुविधांच्या विकासाला लक्ष्य करणाऱ्या स्थानिक रोजगार योजनांची अंमलबजावणीसाठी पंचायत राज्य संस्था प्रभावीपणे करू शकतात.

३. अनुदान निधी स्पष्टपणे ग्रामसभांना प्रदान करण्यात येईल. त्यातील ३०% रक्कम निवारानिगडित पायाभूत साधनसुविधांच्या निर्मितीसाठी, किमान १०% स्थानिक लोकांना प्रत्यक्ष काम करताना प्रशिक्षण देण्यासाठी व बाकी गृहनिर्माण व समाजसंबंधित सुविधांसाठी खर्च केली जाईल.

४. दगडांची भुकटी, कोळशाची राख व लाल माती यांसारख्या स्थानिक पातळीवरील कृषी व औद्योगिक उपक्रमातून उत्पन्न होणाऱ्या टाकाऊ पदार्थांपासून लघु व सूक्ष्मस्तरीय उद्योजकांनी विकेंद्रित रीतीने बनवलेल्या बांधकाम साहित्याच्या व सुट्या भागांचा वापर करण्यात आणि त्यांचा प्रचार करण्यात शासन पुढाकार घेईल.

५. निवारा प्रकल्पावर काम करणाऱ्या मजुरांपैकी किमान ५०% त्याच ग्रामसभेमधील असतील.

६. (५)मध्ये उल्लेखलेल्या मजुरांपैकी किमान ५०% स्त्रिया असतील, ज्या समान वेतनावर कुशल/अर्धकुशल काम करत असतील.

७. संकटपश्चात होणाऱ्या पुनर्बांधकामामध्ये सुद्धा वरील (५) व (६) या कलमांचे पालन होईल.

**४.३ परिणामकारक देखरेख व माहितीची प्राप्ती**

निवाराविकासाशी निगडित असलेल्या कित्येक समस्यांची उकल सातत्यपूर्ण देखरेख व पारदर्शक माहितीप्रवाह, यांच्यातून होऊ शकते. चालू कार्यक्रमांवरील देखरेख व त्यांची अंमलबजावणी, यांच्याखेरीज परिणामकारक कार्यक्रमांच्या रचनेसाठी जमीन, किंमतनिर्धारण व स्थानिक संसाधने यांच्याशी निगडित असलेली माहितीप्रणाली गरजेची आहे. विविध 'इ–शासकीय' उपक्रमांनी दाखवून दिले आहे की माहिती व दूरसंपर्क व्यवस्थांमध्ये अशा माहितीप्रवाहांना कार्यान्वित करण्याची प्रचंड क्षमता असते.

१. स्थानिक इमारत दंडक व नियम, विशेषत: ज्यांचा संबंध शाश्वत इमारती व सुरक्षित बांधकाम यांच्याशी आहे असे, ग्रामपंचायतीकडे स्थानिक भाषेत उपलब्ध करून दिले जातील.

२. राज्यांनी राज्यस्तरीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरण आणि जिल्हानिहाय कृतियोजना तयार कराव्यात यासाठी कांद्र शासन त्यांना पाठबळ पुरवेल. यात नमुना अधिनियम यांची निर्मिती, वैधानिक व नियामक सुधारणा, करवसुलीतील सवलती, वित्तीय क्षेत्रातील सुधारणा आणि संसाधनांच्या उभारणीतील अभिनव प्रयोग वगैरेंचा समावेश असेल.

३. राज्ये जिल्हास्तरीय गृहनिर्माण व निवारा कृतियोजनांच्या आधारे राज्याची गृहनिर्माण व निवारा धोरणे आणि ग्रामीण गृहनिर्माण व निवारा कृतियोजना (एसआरएचएपी) तयार करतील ज्यात (१) भूपुरवठा, (२) अधिनियम/उपनियम यांमधील बदल, (३) तंत्रज्ञानाला प्रोत्साहन, (४) पायाभूत साधनसुविधांसंबंधी तरतुदी यांच्याशी संबंधित (अ) संस्थात्मक, वैधानिक, नियामक व वित्तीय कृतींचा आराखडा असेल.

४. गृहनिर्माण व निवारा संबंधित साधनसुविधा यांचे ग्रामनियोजन जिल्हास्तरीय ग्रामीण विकास संस्थांच्या मदतीने ग्रामपंचायतीच्या नेतृत्वाखाली केले जाईल आणि ते माहितीच्या अधिकारुाुया अधिनियमान्वय जाहीर तपासणीसाठी उपलब्ध असेल.

५. जनतेच्या सर्वसाधारण माहितीसाठी जिल्हा ग्रामीण विकास संस्थांकडे कृतियोजना उपलब्ध केल्या जातील. जिल्हा कृतियोजनांवर राज्यपातळीवर देखरेख ठेवण्याचे काम एका व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे केले जाईल.

६. एसआरएचएपीच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरावर एक देखरेख चौकट तयार करता येईल. गृहनिर्माण व निवारा उपक्रमांच्या थेट लाभधारकांशी संवाद, हा या चौकटीचा अपरिहार्य भाग असेल.

७. केंद्रशासनाच्या पातळीवर बनवलेली एक उच्चस्तरीय देखरेख समिती राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरणाच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेईल.

८. सरकारी संसाधनांबरोबर इतर संसाधने एकवटावीत, यासाठी एसआरएचएपी सहभागाला कृतिप्रवण करणाऱ्या, मार्गदर्शन देणाऱ्या व उत्तेजन देणाऱ्या कृती करेल, ज्यात खाजगी क्षेत्र, स्वयंसेवी संस्था, सीबीओ, राज्य पॅरास्टेटल्स व पीआरआय यांचा समावेश असेल.

९. भारत सरकार मानवी वसाहतींसाठी एक राष्ट्रीय आयोग (एनसीएचएस) स्थापन करेल, ज्याचे कार्य पुढीलप्रमाणे असेल:

क. ‘शाश्वतता’, ‘संतुलित क्षेत्रीय विकास’, ‘निवारा महत्तास्थान’, मूलभूत सेवांची उपलब्धता व गरिबीचा स्वरूप यांच्या आधारे ‘भारतातील मानवी वसाहतीं’चे स्थान निश्चित करणे.

ख. ७३व्या घटनादुरुस्तीने सुरू केलेल्या विकेंद्रिकरणाच्या प्रक्रियेच्या प्रगतीचा आढावा घेणे.

ग. गृहनिर्माण व निवारा यांच्याशी निगडित धोरणाचा उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आंतरक्षेत्रीय कृतियाजना सुचवणे.

घ. वरील (क), (ख) व (ग) संबंधी माहिती गोळा करण्यासाठी संशोधन पार पाडणे, कार्यक्षेत्रांना भेटी देणे, बैठकी आयोजित करणे, वगैरे.

## ५. हिस्साधारकांची भूमिका

**५.१ विविध हिस्साधारकांच्या कृतिप्रधानतेमधून धोरणाची उद्दिष्टे पुढील प्रकारे पार पाडली जातील:**

**५.१.१ गावशासन ऊर्फ पंचायत राज्य संस्था (पीआरआय) आणि ग्रामसभा पुढील कृती करतील:**

* बांधकामातील सुरक्षितता, निवाऱ्याच्या गुणवत्तेचे आरोग्यावरील परिणाम आणि निवाराविकासाचे पर्यावररीय परिणाम यांच्या संदर्भात निवाऱ्याबाबतीत दीर्घकालीन दृष्टिकोन विकसित करणे.

* घरांच्या नेमक्या तुटवड्याचा शोध घेणे आणि गृहनिर्माण, साधनसुविधा व लोकांच्या कार्यकक्ष व ऊर्जा यांसारख्या उपजीविकानिगडित गरजा यांच्या आधाराने गावपातळीवरील ग्रामीण निवारा कृतियोजना तयार करणे.

* ग्रामसभेच्या संमतीने सरकारी अनुदानाच्या लाभधारकांची सूची बनवणे.

* निवाराविकासाच्या अभिनव कार्यपद्धतींसाठी स्थानिक पातळीवरील हिस्साधारकांच्या सुप्त क्षमतेवर आधारित सहभागयुक्त

नियोजन व निधीप्राप्ती यांना प्रोत्साहन देणे.

* गृहनिर्मितीसाठी, विशेषत: आदिवासीसारख्या बाजूला फेकल्या गेलेल्या गटांसाठी जमिनीच्या पुरवठ्याची सोय करणे.

* सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक पातळीवर सहभागी होणे आणि गुणवत्तेवर लक्ष ठेवणे.

**५.१.२ जिल्हापातळीवरील शासन आणि त्यांची साधने अशी असतील:**

* जिल्हापातळीवरील निवारा कृतियोजनांना एकत्र करणे.

*गृहनिर्मितीचे नियोजन रस्ते, सुरक्षित पाणीपुरवठा,, कचऱ्यावरील प्रक्रिया व त्याची विल्हेवाट, ऊजा समस्यांची सोडवणूक, सार्वजनिक वहातूकव्यवस्था, वीजपुरवठा, आरोग्य, शैक्षणिक व करमणुकीच्या सोयी, वगैरेंसारख्या पायाभूत सोयीसुविधांबरोबर होण्यासाठी प्रयत्न करणे.

* घरांच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी आणि घरबांधणीसाठी, विशेषत: दुर्बल गटांसाठी जमिनीचा वाढीव पुरवठा करण्यासाठी कार्यक्रम तयार करणे.

* जिल्हा व गावपातळीवरील कार्याधिकाऱ्यांसाठी, विशेषत: भारतीय राज्यघटनेच्या ११व्या सूचीखालील २९ विषयांच्या संदर्भात स्थानिक पातळीवर क्षमताविकासाचे कार्यक्रम तयार करणे.

*केंद्र व राज्य यांनी पुरस्कृत केलेले गृहनिर्माण व पायाभूत साधनसुविधा यांच्याशी संबंधित योजना व कार्यक्रम लागू करणे.

* नियोजनबद्ध विकासासाठी नियामक उपाययोजनांना परिणामकारकरित्या लागू करणे.

*जमिनीच्या उपलब्धतेच्या समस्येचा समाचार घेण्यासाठी जमिनीचा तुटवडा भासणाऱ्या / जमीन अजिबात नसलेल्या पंचायती आणि भूमिहीनांना देण्याइतकी जादा जमीन असणारे लोक यांच्यातील जमीनपुनर्वाटपामध्ये प्रभावी भूमिका जिल्हा कार्याधिकारी बजावू शकतात.

* संपूर्ण जिल्ह्यातील संसाधने परिणामत: सामायिक बनवणे / त्यांचे संतुलन राखणे व पुनर्वितरण करणे यातून कार्यप्रयत्नांमध्ये एकवाक्यता आणण्याचे लक्ष्य जिल्हापातळीवरील शासन / कार्याधिकारी यांनी बाळगायला हवे. उदाहरणार्थ, परस्परसंबंधांचे जाळे असल्याप्रमाणे कार्य करणाऱ्या गावगट विकसित करता येईल व त्यात स्थानिक अर्थकारण सुधारण्यासाठी व त्याला अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी वस्तूंना चक्राकार फिरवता व त्यांची अदलाबदल करत रहाता येईल.

**५.१.३ राज्य शासन व त्याची साधने अशी असतील:**

* राज्याचे ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरण (एसआरएचएचपी) आणि राज्याची ग्रामीण व निवारा कृतियोजना (एसआरएचएपी) बनवणे.

* गृहनिर्माण व मूलभूत सेवा यांमधील समस्यांच्या समाधानासाठी दीर्घकालीन कार्यक्रम व अल्पकालीन डावपेच तयार करणे. पाण्याचे स्रोत, जोडणीक्षमता, निस्सारण, गटारे, वैयक्तिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व वीजपुरवठा अशा पायाभूत साधनसुविधांसाठीच्या तरतुदींमध्ये एकसंधता आणून त्यातून निवारा ,तसेच उपजीविका यांचा विकास घडवणे.

* वैधानिक व नियामक कार्यचौकटींचा आढावा घेऊन गृहनिर्माण व आधारभूत सोयीसुविधांना बळ देणे.

* गावांमध्ये पाणी, वैयक्तिक स्वच्छता, ऊर्जा व सार्वजनिक वहातूक, यांसारख्या समाजनिगडित सुविधा पुरवणे वा त्यांना सुरळीत बनवणे.

* गावातील संस्थांना त्यांची नियामक व विकास कार्ये पार पाडण्यास सक्षम बनवणे, त्यांची पुनर्रचना करणे व त्यांना मद करणे.

* राज्ये व खाजगी क्षेत्र यांच्या निवारा व उपजीविकासंबंधित कार्यांचे आराखडे बनवणे, त्यांची अंमलबजावणी करणे व त्यांवर देखरेख करणे ही कार्म प्रभावीपणे पार पाडण्यासाठी पीआरआयना प्रशिक्षण देणे.

* एसआरएचएचपीची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी व त्यात पीआरआयना जमीन सहजतेने व किफायतशीरपणे उपलब्ध होण्यावर भर असावा, यासाठी सद्यकालीन कायद्यात व कार्यपद्धतीत सुधारणा करणे व नवीन कायदे पारित करणे.

* खाजगी क्षेत्राने सर्व घटकांसाठी गृहनिर्माण व पायाभूत सोयीसुविधांचे प्रकल्प हाती घ्यावेत यासाठी उत्तेजन व सवलती निर्माण करणे.

* गृहनिर्माण, सूक्ष्मस्तरीय वित्तपुरवठा व पायाभूत सोयीसुविधांचे प्रकल्प यांमध्ये स्वयंसेवी संस्था/सीबीओ, खाजगी क्षेत्र आणि पीआरआय/जिल्हा शासन यांच्यात भागीदारी होण्यास उत्तेजन देणे.

* विकेंद्रित उत्पादन व बांधकाम साहित्याची उपलब्धता यांना उत्तेजन देऊन बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देणे, ज्यात त्याचा उपयोग राज्यपुरस्कृत पायाभूत सोयीसुविधा प्रकल्पांमध्ये विशेष होईल, यावर भर असेल.

* राज्य व स्थानिक पातळीवर व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करणे.

* क्षमताविकासाच्या योग्य कार्यक्रमांद्वारे गृहनिर्माण क्षेत्रात संशोधन–विकास उपक्रमांना उत्तेजन देणे.

* सरकारच्या निवारा व उपजीविका योजनांचा प्रसार दूरवर होईल याची दक्षता घेणे आणि त्या प्राप्त करण्यासाठी मार्ग तयार करणे.

* केंद्र सरकारद्वारा प्रायोजित केलेल्या योजनांमध्ये स्वत:चा वाटा असेल याची दक्षता राज्यांनी घ्यावी.

* आवश्यकता वाटल्यास राज्य सरकारने केवळ ग्रामीण निवाराविकासासाठी विदेशी विकास/निधीदाता संस्थांकडून संसाधनांची उभारणी करावी.

* राज्य आणखी एक भूमिका प्रभावीपरे पार पाडू शकते; ती म्हणजे बंद पडलेल्या बांधकाम केंद्रांना पुनरुज्जीवित करणे. केंद्र सरकारचा खूप जास्त खर्च झालेला असून भरपूर मालमत्तेची (जमीन, इमारती, संयंत्रे व इतर यंत्रसामग्री) निर्मिती करण्यात आली आहे. मात्र त्यांची गणना निकामी मालमत्तेत होते आहे. यांचे योग्य व्यवस्थापन झाल्यास त्या ग्रामीण निवाराविकासासाठी बहुमूल्य संसाधने ठरू शकतात.

**५.१.४ केंद्र शासन पुढील कृती करेल:**

* नियोजन, वित्तपुरवठा, नियमन, संस्था व कायदा यांच्या संदर्भात सुधारणा घडवण्यासाठी पावले उचलणे.

* गृहनिर्माण व पायाभूत सोयीसुविधा क्षेत्राकडे संसाधनांचा पुरवठा व्हावा यासाठी बृहद् आर्थिक धोरणे तयार करणे.

* शाश्वत विकासासाठी जमिनीसकट इतर उपलब्ध संसाधनांचा उत्तम उपयोग व्हावा यासाठी योजना, व्यूहरचना व नियमचौकटी निर्माण करणे.

* पाण्याचे स्रोत, जोडणी व वीजपुरवठा यांसारख्या पायाभूत सोयीसुविधांची आवश्यकतेला पूर्ण करणारी निर्मिती होऊन त्या योग्य प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात यासाठी कृतियोजना बनवणे.

* पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी योग्य परिसरदंडक विकसित करून त्यांची अंमलबजावणी करून मानवी वसाहतींचा जीवनस्तर उंचावणे.

* उपनियमांमध्ये सुधार, कायदा व कार्यपद्धती यांच्या चौकटीचे सुलभीकरण, मालकीखतांची सुरुवात, नियामकांची सुरुवात आणि परिणामकारक योजनांचा विकास यांवर भर देणाऱ्या ग्रामीण सुधारणा चालू ठेवून त्यांचा पाठपुरावा करणे.

* गृहनिर्माण, पायाभूत सोयीसुविधा, नियामक व देखरेख कृतिप्रणाली यांसाठी करवसुलीत सवलती देणे आणि त्या सवलतींचा रोख व वापर यांची दिशा योग्य राहील याची दक्षता घेणे.

* ग्रामीण विकास क्षेत्रातील कृती व वित्त क्षेत्रातील सुधारणा एकत्रित येतील आणि त्यांच्यात सुसूत्रता राहील यातवषयी दक्ष रहाणे.

* संबंधित राज्य सरकारांनी २००६चे राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरण स्वीकारावे व त्याची अंमलबजावणी करावी यासाठी त्यांना सल्ला व मार्गदर्शन पुरवणे.

* राष्ट्रीय पंचवार्षिक योजना व केंद्रशासनाचे अंदाजपत्रक यांमध्ये ग्रामीण निवाराविकासावर योग्य भर राहील याची काळजी घेणे.

* घरबांधणी उपक्रमांमधील राष्ट्रव्यापी व्यवस्थापन माहिती प्रणालीला आधार देऊन गृहनिर्माण कार्यक्रमांना हातभार लावणे व निर्णयप्रक्रियेत सहाय्य करणे.

* ऊर्जावापरात सक्षम असणाऱ्या बांधकामासाठी तंत्रज्ञानाचे अंतरण व अभिनव बांधकाम साहित्याचा विकास, यांसाठी संशोधन–विकास होण्याला उत्तेजन देणे.

* मानवी वसाहतींसाठी एका राष्ट्रीय आयोगाची (एनसीएचएस) स्थापना करणे व नागरी निवाराविकासासोबत ग्रामीण निवाराविकास होत राहील यावर दक्ष देखरेख ठेवणे.

* राष्ट्रीय ग्रामीण निवारा निधी व जोखीम निधी स्थापन करणे.

**५.२ वित्तसंस्थांचे कार्य**

* स्वत:च्या व्यूहरचनांचे पुनर्मूल्यांकन करणे व ग्रामीण भागातील निवाराविकासाच्या दिशेने आपले कामकाज वाढत जावे यासाठी योग्य क्षेत्रांचा शोध घेणे.

* ग्रामीण जनतेच्या गरजांची योग्य दखल घेणाऱ्या वित्तीय योजना तयार करून ग्रामीण ग्राहकांची कर्जफेड सुलभ बनवणे. सुरक्षित व शाश्वत स्वरूपाच्या बांधकाम प्रथांचा वापर व्हावा यासाठी त्यांना वित्तीय सवलती देऊ करणे.

* अतिगरीब लोकांपर्यंत पोचणाऱ्या, प्रस्थापित व्यवस्थेबाहेरील  क्षेत्रावर विसंबणाऱ्या अभिनव कर्ज योजना तयार करणे. या कार्यक्रमांना निधी पुरवण्याचे काम स्वयंसेवी संस्था/सीबीओ करू शकतील आणि त्या आत्मविश्वास वाढवण्याचे, तसेच लाभार्थींकडून अल्पबचत उभारण्याचे कामही करू शकतील.

* स्वयंसहाय्य गटांमधील लायक सभासदांना कर्ज देण्यासाठी स्वयंसेवी संस्था व सूक्ष्मस्तरीय वित्तसंस्था यांना मोठी कर्जे देऊन त्यांच्यात बचतीची सवय व ग्राहक संचय यांची जोपासना करणे. स्वयंसेवी संस्ता व सूक्ष्मस्तरीय वित्तसंस्था यांनी काही काळ जोपासलेले स्वंसहाय्यता गट स्वत:च्या सभासदांना कर्जपुरवठा करण्याचे काम हाताळण्यात सक्षम होत गेलेल्या दिसतात.

* स्वत:च्या संसाधनांचा काही भाग गरिबांसाठी गृहनिर्मिती करण्यात व पायाभूत सोयीसुविधांचा दर्जा उंचावण्यात खर्च करण्याकडेही वित्तसंस्था लक्ष देतील.

* आपल्या कर्जपडताळणी दंडकांमध्ये अधिक लवचिकता आणणे व ग्रामीण ग्राहकांना विमा संरक्षण घेण्यासाठी उद्युक्त करणे.

**५.३ स्वयंसेवी संस्था**

* निवाऱ्याचा परिसर सुरक्षित व आरोग्यपूर्ण असावा, यासाठी सर्वसाधारण जनमत तयार करतील व जनतेचा, सरकारी कार्याधिकाऱ्यांचा  व इतर हिस्साधारकांचा कल गृहनिर्माण व पायाभूत सोयीसुविधा यांच्या बाबतीत वेगवेगळ्या कल्पनांमध्ये भंगलेला न रहाता निवाराविकासाची एकात्मिक कल्पना त्यांच्या मनी साकारेल यासाठी प्रयत्न करतील.

* पीआरआय व गावसमाज यांना तंत्रज्ञानाधिष्ठित व संस्थात्मक उपाय माहीत होतील व उपलब्धसुद्धा होतील यासाठी प्रयत्न करतील.

* निवारासंबंधित विशाल कृतिप्रयत्नांना परिणामकारक, सांभाळण्यायोग्य बनवण्यासाठी व खाजगी गुंतवणूक उपयुक्त ठरावी यासाठी ग्रामीण ग्राहकांना एकत्र आणतील.

* पीआरआयना सोबत घेऊन प्रकल्पांमधील जमीनजोडणी, घरबांधणी व सुविधाविकास यात क्रियाशीलपणे भाग घेतील.

* पंचायतींना सहकार्य/विस्तार सेवा पुरवतील. क्षमताविकास व प्रशिक्षण यातील एकांडेपणा आणि अपुरा पाठपुरावा व गतिरोध हे कालांतराने परिणामकारकतेला बाधा आणतात.

* पंचायतींना विदेशी निधी/ अनुदान मिळवण्यात मदत करतील आणि आवश्यक वाटेल तेथे परिणामकारकता व कार्यक्षमता वाढवण्यात सहाय्य करतील.

### ५.४ खाजगी व कॉर्पोरेट संस्था

* निवाराविकासाच्या संदर्भातील खाजगी उत्पादने व सेवा यांसाठी अर्थपूर्ण बाजारपेठा बनण्याची ग्रमीण भागाची सुप्त क्षमता फुलवण्यासाठी अभिनव मार्ग शोधतील आणि तसे करताना सामाजिक जबाबदारीच्या कॉर्पोरेट उद्दिष्टांना मागे टाकतील.

* निवारानिगडित वस्तू व सेवा यांना ग्रामीण बाजारपेठांनुरूप बनवतील आणि त्यांच्याबाबतीत स्थानिक उद्योजकतेला उत्तेजन देतील.

* सहकार्याने काम करून ज्यांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या होऊ शकेल, अशा सक्षम निवारा उपक्रमांचा विकास करण्यासाठी पीआरआय व स्थानिक स्वयंसेवी संस्थांबरोबर सहकार्य करतील.

### ५.५ संशोधन–विकास अंतरण संस्था

* नव्या  तंत्रज्ञानावर आधारित शाश्वत कार्यप्रयत्नांचा मेळ रूढ व पारंपारिक बांधकाम प्रथांशी, तंत्र व पूर्तता, या दोन्ही स्तरांवर घालतील.

* स्थानिक संसाधने, इमारत बांधकाम व बाजारपेठा यांच्यातील तंत्रज्ञानाधारित संलग्नतेबाबत दीर्घकालीन दृष्टिकोन देतील.

* शक्यतोवर स्थानिक भागात उपलब्ध असलेल्या कच्च्या मालाच्या वापराला उत्तेजन देतील आणि दुर्मिळ संसाधनांचा वापर कमी करून नैसर्गिक परिसरावरील ताण हलका करतील.

* पर्यायी तंत्रज्ञानाचा स्थानिक वापर विस्तारावा, यासाठी त्या तंत्रज्ञानाला हवामान, सामाजिकता व संस्कृती यांच्या प्रचलित दंडकांनुसार अनुरूप बनवतील.

* नवीन बांधकामासाठी व सध्या असलेल्या घरांना मजबूत करण्यासाठी संकटनिवारण तंत्रांना उत्तेजन देतील.

* माहिती व तंत्रज्ञान यांच्यात इतर हिस्साधारकांना सामील करून घेतील आणि बांधकामाच्या नवीन, अभिनव व शाश्वत पद्धतींच्या बाबतीत जागृती निर्माण करण्यास मदत करतील.

### ५.६ आंतरराष्ट्रीय निधीदाता संस्था/देणगीदार

* ग्रामीण निवाराविकासासाठी दिलेल्या निधीचा वापर परिणामकरकरित्या होतो आहे आणि स्वयंसेवी संस्था वा सरकारी कार्याधिकारी त्याचा इच्छित उद्देशाव्यतिरक्त आणखी कशासाठी दुरुपयोग करत नाही, याची काळजी घेतील.

## ६. कृतियोजना / पाठपुरावा

१. राज्यांकडून राज्यस्तरीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरण, तसेच नेमक्या कृतियोजना तयार होण्यामध्ये राज्यांना केंद्र शासन मदत करेल.

२. राज्ये एसआरएचएपी (ग्रामीण गृहनिर्माण व निवारा कृतियोजना) तयार करतील ज्यात (१) भूपुरवठा, (२) अधिनियम/ उपनियम यांमधील बदल, (३) तंत्रज्ञानाला प्रोत्साहन, (४) पायाभूत साधनसुविधांसंबंधी तरतुदी, (५) निवाऱ्याद्वारे उपजीविकांची मजबुती यांच्याशी संबंधित (अ) संस्थात्मक, वैधानिक, नियामक व वित्तीय कृतींचा आराखडा असेल.

३. सरकारी संसाधनांबरोबर समाजनिगडित व खाजगी क्षेत्रातील संसाधने संस्थारूप व्हावीत, यासाठी एसआरएचएपी सहभागाला

कृतिप्रवण करणाऱ्या, मार्गदर्शन देणाऱ्या व उत्तेजन देणाऱ्या कृती करेल, ज्यात खाजगी क्षेत्र, स्वयंसेवी संस्था, सीबीओ, राज्य पॅरास्टेटल्स व पीआरआय यांचा समावेश असेल.

४. पाणी, गटारे व वैयक्तिक स्वच्छतेच्या सुविधा यांनी युक्त अशा संबंधित साधनसुविधांच्या योगे शाश्वत घरांचा पुरवठा बळकट व्हावा, यासाठी कृतियोजना व कार्यक्रम यांचा भर गृहनिर्मितीकडे निधीचा प्रवाह चालू रहाण्यावर असेल. यात निवाऱ्याचे विविध किफायतशीर पर्याय, नियोजनयुक्त व संतुलित क्षेत्रीय विकास, रोजगारनिर्मिती, दुर्बल घटक व कमकुवत गट यांचे संरक्षण, भागीदारीला उत्तेजन, ग्रामीण परिसराचे संवर्धन आणि व्यवस्थापन माहिती प्रणालीचा विकास, यांचा समावेश असेल.

५. भारत सरकार मानवी वसाहतींसाठी एक राष्ट्रीय आयोग (एनसीएचएस)स्थापन करेल, ज्याचे कार्य असे असेल:

क) 'शाश्वतता', 'संतुलित विभागीय विकास', 'निवाराविषयक महत्तास्थिती', मूलभूत सेवांची उपलब्धता, गरिबीचे स्वरूप व आकार यांच्या बाबतीतील 'भारतातील मानवी वसाहती' यांच्या महत्तास्थितीचे मूल्यांकन करणे.

ख) ७३व्या घटना दुरुस्तीने  सुरू केलेल्या विकेंद्रिकरणाच्या प्रक्रियेतील प्रगतीचा आढावा घेणे.

ग) गृहनिर्माण व निवारासंबंधित धोरणांची उद्दिष्टे गाठण्यासाठी आंतरक्षेत्रीय कृतियोजना सुचवणे.

घ) वरील (क), (ख) व (ग) वर माहिती जमा करण्यासाठी संशोधन पार पाडणे, कार्यक्षेत्रांना भेटी, बैठका, यांचे आयोजन करणे, वगैरे.

६. २००६च्या राष्ट्रीय ग्रामीण गृहनिर्माण व निवारा धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी केंद्र शासनाच्या स्तरावर एका उच्च स्तरीय देखरख समितीचा स्थापना करण्यात येईल.

**७. मानवी वसाहतींचा शाश्वत व समावेशक विकास होण्याची हमी प्राप्त करणे, हे या धोरणाचे अंतिम उद्दिष्ट आहे. सर्व हिस्साधारकांच्या सुप्त क्षमतेचा उपयोग करून घेऊन सर्व नागरिकांना 'निवारा' मिळावा आणि त्यांच्या जीवनाची गुणवत्ता वर जावी, यासाठी हा प्रयत्न आहे.**

## परिशिष्ट

२३ फेब्रुवारी २००६ रोजी नवी दिल्ली येथे भरलेल्या कार्यशाळेत विकसित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय गृहनिर्माण व निवारा धोरणा'च्या पहिल्या मसुद्यामध्ये हातभार लागलेल्या व्यक्ती (इंग्रजी आद्याक्षरांनुसार)

| क्र. पहिले नाव | संस्था | इमेल पत्ता |
|---|---|---|
| १. अमिताभ मुखर्जी | होल्टेक कंसल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड | am@holtecnet.com |
| २. अशोक खोसला | डेव्हलपमेंट आल्टरनेटिव्ज | akhosla@devalt.org |
| ३. अवनी मल्होत्रा | स्विस एजन्सी फॉर डेव्हलपमेंट अँड कोऑपरेशन | avni.malhotra@sdc.net |
| ४. भागवत प्रसाद | एबीएसएसएस | abssss@sanchrnet.in |
| ५. बिनॉय आचार्य | उन्नती | unnatiad1@sanchrnet.in |
| ६. जी एस मेनन | नाबार्ड | nabnfs@bom5.vsnl.net.in |
| ७. जो मेडियथ | ग्राम विकास | info@gramvikas.org |
| ८. जॉय इलेमॉन | एसडीसी–कॅपडेक | capdeck@asianetindia.com |
| ९. किरन शर्मा | पॅक्स प्रोग्राम | ksharma@devalt.org |
| १०. कीर्ती शाह | आयएनएचएएफ | kirtee@ksadps.com |
| ११. मेघना कुलकर्णी | सहयोग म्र्मिती | itr_sahayog@sanchrnet.in |
| १२. मोना छाब्रा आनंद | डेव्हलपमेंट आल्टरनेटिव्ज | mchhabra@devalt.org |
| १३. नयना शाह | एक्सनोरा इंटरनॅशनल | exnora@gmail.com |
| १४. प्रभात राव | एचडीएफसी बँक लिमिटेड | prabhatr@hdfc.com |
| १५. प्रवन वारन | यूएन कमिशन ऑन ह्युमन राइट्स | pwaran@hic-sarp.org |
| १६. आर इलँगो | टीव्हीएसजी | panchayat@yahoo.com |
| १७. डी सुब्रह्मण्यम | हुडको | subbu@hudco.org |
| १८. एस के शर्मा | पीपल फर्स्ट | peoplefirst@devalt.org |
| १९. शिवानी चौधरी | यूएन कमिशन ऑन ह्युमन राइट्स | schudhry@hiv-sarp.irg |
| २०. सुभाष चंद्र जलोरा | डेव्हलपमेंट सोल्युशन्स | dsajmer@datainfosys.net |
| २१. झीनत नियाझी | डेव्हलपमेंट आल्टरनेटिव्ज | zniazi@devalt.org |